बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक २८ | बुधवार,दि.१५ जुन २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

## गोंदिया बल्लारशा रेल्वेमार्गावर रेल्वेच्या धडकेत वाघाचा मृत्यू



**अर्जुनी-मोरगाव :** गोंदिया-बल्लारशा रेल्वे मार्गावर कोरंभी राखीव वनक्षेत्रातील कक्ष क्रमांक-२६० मध्ये रेल्वेच्या धडकेत वाघ-ाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि.१०) रात्री घडली.शनिवारी सकाळी रेल्वे मार्गावर गस्त घालणाऱ्या रेल्वे कर्मचाऱ्यांच्या ही बाब निदर्शनास आली. मृत वाघाचे वय अंदाजे ६-७ वर्षे असल्याचे सांगण्यात येते. नेमक्या कोणत्या रेल्वेने वाघाला धडक दिली ते कळू शकले नाही.

तालुक्यात वाघाची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. यापूर्वी कालीमाती जंगल परिसरात वाघाची शिकार उजेडात आली होती. तालुक्यात ६ महिन्यांत वाघाच्या मृत्यूची ही दुसरी घटना आहे. कोरंभी -चारभट्टी देवस्थान मार्गादरम्यान गोंदिया-बल्लारशा रेल्वे मार्ग आहे. शुक्रवारी (दि.१०) रात्री या मार्गाने धावणाऱ्या रेल्वे गाडीने वाघाला धडक दिली. शनिवारी (दि.११) सकाळी या रेल्वे मार्गाची गस्त घालणाऱ्या कर्मचाऱ्यांनी मृत वाघाची माहिती वनविभागाला कळविली. वाघाची कंबर व डाव्या पायाची मांडी तुटलेली आहे. त्याच्या शरीरावर मागील बाजूस खरचटले आहे. वाघाच्या शरी-राचे सर्व अवयव शाबूत आहेत. ही दुर्घटना शुक्रवारी रात्री गोंदिया-बल्लारशा रेल्वेने झाली असण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

घटनास्थळी गोंदियाचे उपवनसंरक्षक कुलराजसिंह, नवेगावबांधचे प्रकाष्ठ निष्कासन अधिकारी दादा राऊत, वनपरिक्षेत्राधिकारी श्रावण खोब्रागडे, मानद वन्यजीव रक्षक मुकुंद धुर्वे, क्षेत्र सहायक वासुदेव वेलतुरे, उमेश गोटेफोडे, वनरक्षक प्रियंका राऊत व वनकर्मचारी उपस्थित होते.

# संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या शिळा मंदिराचे प्रधानमंत्र्यांनी केले लोकार्पण

**पंढरपूर:** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज देहूतील संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या शिळा मंदिराचे लोकार्पण करण्यात आले. लोकार्पण सोहळ्यानंतर सभेला संबोधित करताना पंढरपूर पालखी मार्गांच्या विकासासाठी सरकार ११०० कोटींचा खर्च करेल. या माध्यमातून ३५० किलोमीटरचा महामार्ग तयार करण्यात येईल, अशी घोषणा नरेंद्र मोदींनी केली.

पालखी मार्गांच्या विकासासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असून संत तुकाराम महाराजांच्या पालखी मार्गाचे काम ३ टप्प्यात तर संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी मार्गाचे काम २ टप्प्यात करण्यात येईल, अशी माहिती नरेंद्र मोदी यांनी दिली. याशिवाय महू येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जन्मस्थळ, मुंबईतील चैत्यभूमी आणि नागपूर येथील दीक्षा भूमीचाही विकास करण्यात येईल, असे मोदी म्हणाले.

**देहूत येणे हे माझे भाग्य**

देहू हे संत शिरोमणी तुकाराम महाराजांचे जन्मस्थळ आणि कर्मस्थळ आहे. अशा या देहूच्या पवित्र तीर्थभूमीवर मला येता आले, हे मी माझे भाग्य समजतो. मजेथे नांदे देव पांडुरंग, धन्य ते क्षेत्रवासी लोक फ, अशा शब्दांत मोदींनी आपल्या भावना व्यक्त



केल्या. यावेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत पाटील, देहू मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष नितीन महाराज मोरे, आळंदी देवस्थानचे योगेश देसाई, पंढरपूर देवस्थान उपाध्यक्ष गहिनीनाथ महाराज अवसरे ,मारुतीबाबा कुरहेकर, आचार्य तुषार भोसले आदी उपस्थित होते.

**तुकोबांच्या शिकवणीनुसारच आमचे धोरण**

मोदी म्हणाले, संत तुकाराम यांची शिळा केवळ शिळा नसून ती भक्तीची प्रेरणा आहे. या शिळेवर स्वत: तुकाराम महाराजांनी १३ दिवस तपस्या केली. त्यामुळे ही शिळा भक्ती आणि ज्ञानाची आधारशिला आहे. तुकाराम महाराज यांच्या गाथांचे रक्षण करणारे सुदुंबरे येथील संत जगनाडे महाराज यांनाही मी नमन करतो. तुकाराम महाराज गरीब, श्रीमंत असा भेद मानत नव्हते. तसा भेदभाव करणे मोठे पाप असल्याचे तुकाराम महाराज म्हणत. सरकारदेखील तुकाराम महाराजांच्या याच शिकवणूनूसार सबका साथ ,सबका विश्वास या धोरणाने काम करत आहे, असे मोदी म्हणाले.

भारत ही संताची भूमी आहे. समाज आणि देशाला दिशा देण्याचे काम संतांनी सदैव केले आहे. भारतीय संस्कृती टिकवून ठेवत ती पुढे नेण्याचे काम संतांनी केले आहे. प्रतिकूल परिस्थितीत तुकाराम महाराजांनी त्याग करत समाजाला दिशा देण्याचे काम केले. त्यांच्या अभांगानी समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे. सांस्कृतिक मूल्य आधारित त्यांच्या अभंगांनी समाजाला उर्जा दिली, असे मत प्रधानमंत्री मोदी यांनी व्यक्त केले.

## पुरातन खामतलाव संकटात

**भूमाफियांकडून तलाव बुजविण्याचे काम : कारवाई करण्याची मागणी**



**तिरोडा:** शहराच्या मध्यभागी असलेल्या पुरातन खाम तलावाला बुजवण्याचे काम काही भूमाफियांकडून सुरू आहे. त्यामुळे तलाव संकटात सापडला असून हे काम तत्काळ बंद करावे, भूमाफियांवर कारवाई करावी, अशी मागणी मनसेचे जिल्हाध्यक्ष हेमंत लिल्हारे यांनी केली आहे.

खातमलाव तिरोडावासीयांसाठी जिवनवाहीनी आहे. सामाजिकदृष्ट्या विचार केल्यास कान्होबा, गणपती, नवदुर्गा विसर्जन केले जाते. जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय होते. इतकेच नव्हे, लोकोपयोगी कामासाठी तलावाच्या पाण्याचा वापर करण्यात येतो. परंतु, सद्य:स्थितीत या तलावाकडे भूमाफियांची नजर गेली असून तलाव प्रशासनाच्या छुप्या संगणमताने बुजवण्याचे काम सुरू आहे. असा आरोप लिल्हारे यांनी केला आहे. याबाबतची लेखी तक्रार त्यांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना केली आहे.

**उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले चौकशीचे आदेश**

**तलाव बुजविण्याचे काम सुरू असल्याची तक्रार मनसेचे जिल्हाध्यक्ष हेमंत लिल्हारे यांनी केली असता त्याची दखल घेत उपविभागीय अधिकारी पूजा गायकवाड यांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना पत्र पाठविले. खामतलाव नकाशाप्रमाणे राखीव असून तलाव बुजवण्याचे काम सुरू असल्याची माहिती तक्रारीद्वारे प्राप्त झाली असल्याने याविषयीची सविस्तर माहिती चौकशी करून सादर करण्याचे आदेश लेखी स्वरुपात दिले आहे.**

## नेहरु सहकारी धानगिरणीच्या धानखरेदी प्रकरणातील अफरातफर प्रकरणी गुन्हा दाखल

**गोंदिया:** गोंदिया जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षापासून शासकीय योजनेंतर्गत धान खरेदी केंद्र सुरु असून गेल्या काहीवर्षापुर्वी झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने गोरेगाव येथील नेहरु सहकारी धानगिरणी संस्थेच्या धान खरेदी केंद्रांतर्गतच्या लेखापरिक्षणात सुमारे ३ कोटी ७७ लाख ९८ हजार ६०० रुपयाचा अपहार झाल्याचे जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग १ यांनी आपल्या तपासणी अहवालात नोंदवले आहे. त्या तपासणी अहवालाच्या आधारावर गोरे-गाव पोलिस ठाणे येथे भांदवीच्या कलम ४०८,४०९,४०६,४६७,४६८,७१ व ३४ अंतर्गत आज १० जुन रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या तक्रारीत गोरेगाव तालुक्यातील नेहरु सहकारी धानगिरणीच्या दवडीपार व कवलेवाडा येथील धान खरेदी केंद्राचा उल्लेख करण्यात आला असून १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०२० या दरम्यान घोळ झाल्याचे म्हटले आहे.जिल्हा लेखा परीक्षक वर्ग १ च्या अहवालानुसार संचालक मंडळ, ग्रेडर व व्यवस्थापकासह एकुण २४ जणांविरुध्द ३ कोटी ७७ लाख ९८ हजार ६००/- इतक्या रक्कमेचा अपहार केल्याचे म्हटले आहे. यासंदर्भात गोरेगाव पोलीस ठाण्यात सहकार आयुक्त कार्यालयाने नेमलेल्या चौकशी समितीने नोंदवलेल्या तक्रारीवर गुन्हा दाखल केलेला आहे.

# आमगावचे सपोनि एसीबीच्या जाळयात



**गोंदिया:** तक्रारदार शेतकऱ्यावर गुन्हा दाखल न करण्यासाठी खासगी ढाबा मालकामार्फत एक लाख रुपयांची लाच स्वीकारणारा सहायक पो-लीस निरीक्षक व त्या खासगी ढाबा मालकाविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ही लाच रक्कम स्वीकारताना ढाबा मालकाला रंगेहात पकडण्यात आले. सदर कारवाई रविवार, १२ जून रोजी अमृत ढाबा गोरठा ता. आमगाव येथे करण्यात आली. श्रीकांत पांडुरंग पवार (वय ३७) नेमणूक पोलीस ठाणे आमगाव असे त्या आर-ोपी लाचखोर सहायक पोलीस निरीक्षकाचे नाव असून, अनिल किसनलाल सोनकवरे (वय ३७) रा. गोरठा, पो. ठाणा, ता. आमगाव असे लाच स्वीकारणाऱ्या आरोपी खासगी ढाबा मालकाचे नाव आहे.

सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार हे शेतकरी असून ते यापूर्वी प्लॉट खरेदी-विक्रीचे काम करीत होते. त्यांनी मौजा आमगाव येथे प्लॉट खरेदी-विक्री केलेले आहेत. त्यांना सहायक पोलीस निरीक्षक पवार याने मोबाइलवर फोन करून, त्यांच्या विरोधात सरकारी जमीन विकल्याचे तक्रार अर्ज आले आहे. त्यामुळे आपल्यावर गुन्हा दाखल होईल. कारवाईला सामोरे जायचे नसेल तर आपणास मला पाच लाख रुपयांची लाच द्यावी लागेल. त्यामुळे पाच लाख रुपये घेवून आमगाव पोलीस ठाण्यात या, असे सांगून तक्रारदाराला पाच लाख रुपयांची मागणी केली. मात्र तक्रारदाराने पाच लाख रुपये देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे तक्रार दाखल केली. यानंतर आरोपी सहायक पोलीस निरीक्षक श्रीकांत पवार याने तक्रारदाराकडे केलेल्या लाच मागणीची योग्य पडताळणी करण्यात आली. दरम्यान आमगाव पोलीस ठाण्यात असलेल्या तक्रार अर्जावरून गुन्हा दाखल न करण्याकरिता सहायक पोलीस निरीक्षक श्रीकांत पवार याने पाच लाख रुपये लाचेची मागणी केली. तडजोडीअंती २ लाख रुपये लाच रकमेची मागणी करून त्यापैकी पहिला हप्ता एक लाख रुपये आरोपी ढाबा मालक अनिल किसनलाल सोनकवरे रा. गोरठा याच्या हस्ते स्वीकारण्याची तयारी दर्शविली.

१२ जून रोजी अमृत ढाबा गोरठा ता. आमगाव येथे ला-चेचा सापळा रचण्यात आला. त्यात आरोपी सहायक पोलीस निरीक्षक श्रीकांत पांडुरंग पवार याने तक्रारदाराविरुद्ध गुन्हा दाखल न करण्यासाठी आरोपी खासगी इसम अनिल किसनलाल सोनकवरे याच्याकडे लाच रकमेचा पहिला हप्ता एक लाख रुपये देण्यास सांगितले.

आरोपी अनिल सोनकवरे याने पंचासमक्ष लाच रकमेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारली. त्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक श्रीकांत पवार याला ताब्यात घेवून दोन्ही आरोपींविरुद्ध आमगाव पोलीस ठाण्यात कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ही कामगिरी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपुरचे पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक मधुकर गीते यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपअधीक्षक पुरुषोत्तम अहेरकर, पोलीस निरीक्षक अतुल तवाडे, सहायक फौजदार चंद्रकांत करपे, पोलीस हवालदार मिल्कीराम पटले, संजय बोहरे, नायक पोलीस शिपाई राजेंद्र बिसेन, मंगेश कहालकर, अशोक कापसे, संतोष शेंडे, संतोष बोपचे, संगीता पटले यांनी केली.

## झांजिया येथील सरपंच बेमुदत उपोषणावर

**गोरेगाव :** गोरेगाव ते ठाणा मार्गावर झांजियाच्या हद्दीत जुन्या टायरपासून कच्चा तेल काढण्याचा कारखाना आहे. हा कारखाना कायमस्वरूपी बंद करण्यात यावा, या मागणीसाठी झांजियाच्या सरपंच उषा दिहारी यांनी तहसील कार्यालयासमोर सोमवारपासून (ता. १३) बेमुदत उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या या उपोषणाला कारखानालगतच्या शेतकऱ्यांसह गावकऱ्यांनी पाठिंबा दिला आहे.

तहसीलदार सचिन गोसावी यांनी धीरज अग्रवाल यांनी लावलेला कारखाना व लगतच्या शेतजमिनीची चौकशी केली. अहवाल तिरोड्याच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना सादर केला. परंतु, उपविभागीय अधिकारी कारवाईसाठी दिरंगाई करीत आहेत. अकृषक आदेश अटीचा भंग झाला असून, कारखाना बांधकामासाठी परवानगी घेण्यात आली नाही. तसेच लगतच्या शेतजमिनीचे काळ्या राखेमुळे नुकसान होत आहे, असा उल्लेख तहसीलदारांनी अहवालात केला असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानंतर निर्णय घेता येईल, असाही उल्लेख अहवालात केला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ शेतकऱ्यांच्या विरोधात अहवाल सादर करतो. त्यामुळे झांजिया येथील नागरिकांना न्याय मिळणार नाही, असा आरोप करीत सरपंच उषा दिहारी यांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.कारखान्याकरिता धीरज अग्रवाल यांनी गट क्रमांक ७७ आराजी ०.२८ हेक्टर आर शेतजमिनीत इंडस्ट्रीज प्रयोजनार्थ ९ ऑक्टोबर २०१२ ला अकृषक परवानगी घेतली आहे. पण कारखाना उभारताना अटीचे पालन केले नाही. या कारखान्यातून निघणाऱ्या काळी रंगाच्या धूळ व गॅसमुळे लोकांना त्रास होत आहे. तसेच कारखानाधारकाने बांधकामाबाबत कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही.

अकृषक आदेशात नमूद अटी व शर्थीचे पालन केले नाही. कारखान्यामुळे लगतच्या शेतजमिनीचे नुकसान होत आहे. तरीसुद्धा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कारखानदारास प्रदूषण होत नसल्याचे प्रमाणपत्र देत असते.




या प्रमाणपत्राची मुदत ३१ मे रोजी संपलेली आहे. मात्र, अधिकारी शेतकऱ्यांना न्याय देण्यास टाळाटाळ करीत आहेत, हे येथे उल्लेखनीय.

## गरजू लाभार्थ्यांना प्राधान्याने योजनांचा लाभ द्या-खा.नेते

गोंदिया: केंद्र व राज्य सरकारच्या लोकोपयोगी योजनांचा गरजू लाभार्थ्यांना प्राधान्याने लाभ द्या असे निर्देश खासदार अशोक नेते यांनी अंमलबजावणी यंत्रणांना दिले.जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची (दिशा) बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती त्यावेळी ते बोलत होते.

जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, खासदार सुनील मेंढे, आमदार मनोहर चंद्रिकापुरे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, जिल्हा परिषद उपाध्यक्ष यशवंत गणवीर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शीतल पुंड यांचेसह दिशा समितीचे सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

मागील सभेच्या इतिवृत्ताचा अनुपालन अहवाल पुरेशा अवधी पूर्वी सदस्यांना देण्यात यावा अशा सूचना अध्यक्षांनी दिल्या. दिशा समितीमार्फत केंद्र सरकारच्या ४४ पेक्षा अधिक योजना राबविल्या जातात. या योजनांचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. केंद्र व राज्य सरकार नागरिकांच्या हिताच्या असंख्य योजना तयार करते. या योजना लाभार्थ्यांपर्यत पोहोचवण्याची जबाबदारी यंत्रणांची आहे असे अध्यक्षांनी सांगितले. बिरसी विमानतळमध्ये जमीनी व घरे गेलेल्या कुटुंबाचे पुनर्वसन, ग्रामीण रस्ते, पीक विम्याची रक्कम, मुद्रा योजना कर्ज वाटप, राष्ट्रीय महामार्ग, जलजीवन मिशन योजनांबाबत या बैठकीत निर्देश देण्यात आले.

किसान सन्मान योजनेत अनेक शेतकरी वंचित असल्याचे निदर्शनास आल्याचे सांगत हा विषय मार्गी लावावे असे सांगितले.प्रधानमंत्री आवास योजनेत दिव्यांग व्यक्ती व विधवा महिलांना प्राधान्य देण्यात यावे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) पीपीपी पद्धतीने राबविता येईल का या अनुषंगाने प्रयत्न करण्यात यावेत अशी सूचना करण्यात आली. या बैठकीत खासदार सुनील मेंढे, आमदार मनोहर चंद्रिकापुरे यानी विविध विषयांवर सूचना केल्या.बैठकीचे संचालन शीतल पुंड यांनी केले.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, दीनदयाल अंत्योदय योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना, राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रम, प्रधानमंत्री आवास योजना (सर्वांसाठी घरे शहरी), प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, स्वच्छ भारत मिशन शहरी व ग्रामीण, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम, प्रधानमंत्री कृषी सिचाई योजना, स्मार्ट शहर अभियान, उज्वल डिस्कॉम इंशोरन्स योजना, प्रधानमंत्री फसल बिमा योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, सर्व शिक्षा अभियान, एकात्मिक बाल विकास योजना, मध्यान्ह भोजन योजना, प्रधानमंत्री उज्वला योजना, जल मार्ग विकास प्रकल्प, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना व डिजिटल योजनांचा आढावा बैठकीत घेण्यात आला.






# पालिका,पंचायतीची आरक्षण सोडत जाहीर

**■ ५० टक्के महिलाराज ■२१ जून पर्यंत मागविल्या हरकती व सूचना**

**गोंदिया:** सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाने ठरवून दिलेले ओबीसी आरक्षण रद्दबातल ठरविले. त्यानंतर आता जिल्ह्यात नगर पालिका आणि नगर पंचायतीच्या निवडणुकीच्या हालचाली निवडणूक विभागाने सुरू केल्या. आज सोमवारी गोंदिया, आमगाव आणि तिरोडा नगर पालिका तसेच गोरेगाव नगर पंचायतीच्या आगामी निवडणुकीकरिता आरक्षण सोडत जाहीर केली. या सोडतीत ५० टक्के महिला आरक्षण असणार असून ओबीसी प्रवर्गाला खुल्या गटातून निवडणूक लढावी लागणार आहे. १५ ते २१ जून या कालावधीत संबंधितांना हरकती किंवा आक्षेप घेता येणार आहे. त्यानंतर अंतिम आरक्षण जाहीर करण्यात येणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून ओबीसी आरक्षणावरून रणकंदन सुरू आहे. राज्य शासन सर्वोच्च न्यायालयासमोर ठोस बाजू मांडू शकले नाही, त्यामुळे राज्य शासनाने निवडणुकीत ओबीसी प्रवर्गाकरिता ठरवून दिलेले आरक्षण न्यायालयाने रद्द केले. ओबीसी आरक्षणाशिवाय त्या जागा खुल्या गटातून लढविण्याचा निर्णय घेतला. तीन चार महिन्यांपूर्वी पार पडलेल्या जिल्ह्यातील पंचायत समित्या, नगर पंचायती आणि जिल्हा परिषदेची निवडणूक ओबीसी आरक्षणाशिवाय घेण्यात आली. हा ओबीसी प्रवर्गावर होणारा अन्याय असल्याचा आरोप होत आहे. सर्वाधिक लोकसंख्या ओबीसी प्रवर्गाची असताना देखील त्यांच्याकरिता एकही जागा राखीव नसल्यामुळे खदखद व्यक्त करण्यात येत आहे. तिरोडा आणि गोंदिया नगर पालिका तसेच गोरे-गाव नगर पंचायतीच्या सदस्यांचा कार्यकाळ यापूर्वीच संपूष्टात आला. त्यामुळे या तीनही स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक राज सुरू आहे. राज्य निवडणूक आयोगाने आता नगर पंचायती आणि नगर पालिकांची निवडणूक देखील ओबीसी आरक्षणाशिवाय घेण्याची सूचना केली. त्याप्रमाणे प्रशासन कामाला लागले आहे.

सोमवारी गोंदिया आणि तिरोडा नगर पालिका आणि गोरेगाव पंचायतीची प्रभागनिहाय आरक्षण सोडत काढण्यात आली. या पहिल्यांदाच नगर पालिका आणि नगर पंचायतीची निवडणूक ओबीसी आरक्षणाशिवाय घेण्यात येणार आहे. त्यामुळे आता निवडणूक लढविणाऱ्यांत चढाओढ निर्माण होणार असून अनेकांना निवडणुकीत फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आज जाहीर झालेल्या आरक्षण सोडतीवर २१ जून पर्यंत हरकती आणि आक्षेप घेता येणार आहे. आरक्षण व सोडतीच्या अनुषंगाने हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी १५ जून ते २१ जून २०२२ हा असणार आहे.

आरक्षण सोडतीचा अहवाल संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन यांच्याकडे २४ जून २०२२ पर्यंत पाठविण्यात येईल. २९ जून २०२२ पर्यंत विभागीय आयुक्त नगरपरिषद व नगरपंचायत सदस्य पदांच्या आरक्षणास मान्यता देतील. १ जुलै २०२२ पर्यंत सदस्य पदांच्या आरक्षणाची अधिसूचना जाहीर करण्यात येणार आहे.

### गोंदिया नगर पालिकेतील आरक्षण

**प्रभाग क्रमाक ३ ते १२, प्रभाग १ आणि २१ सर्वसाधारण महिला व पुरुष राखीव, प्रभाग क्रमांक २ महिला अनुसूचित जमाती व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक १३ अनुसूचित जमाती महिला व सर्वसाधारण पुरुष, प्रभाग १४ अनुसूचित जाती पुरुष व सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक १५ अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्रमांक १६ ते १८ अनुसूचित जाती पुरुष व सर्वसाधारण महिला, प्रभाग १९ अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्रमांक २० अनुसूचत जाती महिला व सर्वसाधारण पुरुष, प्रभाग क्रमांक २२ अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण पुरुष**

### आमगाव नगर पालिका

**प्रभाग क्रमांक १ ते ७ सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ८ अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ९ अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक १० अनुसूचित जाती सर्वसाधारण व सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ११ अनुसूचित जमाती सर्वसाधारण व सर्वसाधारण महिला.**

### गोरेगाव नगर पंचायत

**प्रभाग क्रमांक १ सर्वसाधारण, प्रभाग दोन सर्वसाधारण, प्रभाग ३ सर्वसाधारण महिला, प्रभाग ४ सर्वसाधारण महिला, प्रभाग ५ अनुसूचित जमाती ( महिला), प्रभाग ६ सर्वसाधारण, प्रभाग ७ सर्वसाधारण महिला, प्रभाग ८ सर्वसाधारण, प्रभाग ९ अनुसूचित जमाती, प्रभाग १० सर्वसाधारण, प्रभाग ११ सर्वसाधारण महिला, प्रभाग १२ अनुसूचित जाती, प्रभाग १३ सर्वसाधारण महिला, प्रभाग १४ सर्वसाधारण महिला, प्रभाग १५ अनुसूचित जाती महिला, प्रभाग १६ सर्वसाधारण आणि प्रभाग १७ सर्वसाधारण.**

### तिरोडा नगर पालिका

**प्रभाग क्रमांक १ व २ अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ३ सर्वसाधारण महिला व अनुसूचित जाती पुरुष, ४ ते ८ सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक ९ सर्वसाधारण महिला व अनुसूचित जाती, प्रभाग क्रमांक १० सर्वसाधारण महिला व अनुसूचित जमाती.**

## संपादकीय

# पुन्हा पसरतोय कोरोना

बुद्धिमान अशा अवघ्या मानव जातीला वेठीस धरून मसळो की पळोफ करून सोडणारा आणि तब्बल दोन वर्षे जगभरात थैमान घालणारा महाभीषण असा कोरोना विषाणू पुन्हा एकदा आपले हात-पाय पसरू लागला आहे. कोरोना संसर्गाचा वेग मंदावल्यानंतर सरकारकडून अलीकडेच निर्बंध उठविण्यात आले होते. त्यामुळे पुन्हा एकदा लोकांचे जीवन हळूहळू पूर्वपदावर येत होते. मात्र आता सर्वजण बेसावध असताना पुन्हा एकदा कोरोना विषाणूने डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे. देशभरासह महाराष्ट्रातही कोरोनाचे सक्रिय रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. देशात कोरोनाच्या संसर्गात मोठी वाढ झाली आहे. गेल्या २४ तासांत चार हजारांहून अधिक नवे कोरोनाबाधित रुग्ण आढळले आहेत. तसेच दिवसभरात १० रुग्णांचा मृत्यूही झाला आहे. विशेष गंभीर बाब म्हणजे मार्च महिन्यानंतर देशात झालेली ही सर्वाधिक रुग्णवाढ आहे. देशात ११ मार्चनंतरची ही कोरोना रुग्णांची मोठी नोंद झाली आहे. त्यामुळे कोरोनाबाधितांची संख्या तीन हजारांवरुन चार हजारांवर पोहोचली आहे. आदल्या दिवशी देशात ३७१२ नवीन रुग्ण आढळले होते. त्यानंतर आज हा आकडा चार हजारांच्या वर पोहोचला आहे. या आकडेवारीवरुन देशात कोरोनाच्या संसर्गात झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. देशातील सक्रिय रुग्णांची संख्याही आता २० हजारांच्या वर पोहोचली आहे. सक्रिय रुग्णांच्या वाढीचा दर ०.०५ टक्के आहे, तर देशातील रुग्ण बरे होण्याचा दर ९८.७४ टक्के आहे. दिवसभरात २ हजार ३६३ रुग्ण बरे झाले आहेत, तर गेल्या २४ तासांत १० कोरोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. तसेच ४ लाख २५ हजार ३७९ नमुने तपासण्यात आले आहेत, तर देशव्यापी कोरोना लसीकरणात आतापर्यंत १९३ कोटींहून अधिक जणांना कोरोना प्रतिबंधात्मक लसी देण्यात आल्या आहेत आणि हा एक विक्रमच आहे. असे असले तरी या जीवघेण्या कोरोनाने देशभरात आतापर्यंत ५ लाख २४ हजार ६५१ जणांचा बळी घेतला आहे. ही आकडेवारी पाहिली तरी नजरेस न पडणाऱ्या या विषाणूची दाहकता किती आहे? हे कुणाच्याही लक्षात येईल. असे असले तरी देशात कोरोना विषाणूच्या संसर्गातून ४ कोटी २६ लाख २२ हजार ७५७ रुग्ण बरे झाले आहेत. आपल्यासाठी अधिक चिंतेची बाब म्हणजे महाराष्ट्रात कोरोनाचे सर्वाधिक नवे रुग्ण आढळले आहेत व त्या दृष्टीने सावधगिरी बाळगण्याची गरज आहे. गेल्या २४ तासांत महाराष्ट्रात १०४५ रुग्ण आढळले आहेत. त्याखालोखाल राजधानी दिल्लीमध्ये ३७३, तामिळनाडू १४५, तेलंगणात ६७, गुजरातमध्ये ५०, तर मध्य प्रदेशमध्ये २५ नव्या कोरोनाबाधितांची नोंद झाली आहे. देशपातळीवर कोरोना रुग्णवाढ कायम आहे. एका दिवसाआधी कोरोना रुग्णांमध्ये घट झाल्यानंतर पुन्हा कोरोना रुग्ण वाढले आहेत. देशात गेल्या २४ तासांत २७४५ नवे कोरोनाबाधित आढळले असून सहा रुग्णांचा मृत्यू झाला आहे. राजधानी दिल्लीतही हा विषाणू हातपाय पसरत चालला असून काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांना कोरोनाची लागण झाली असल्याचे वृत्त आहे. त्यानंतर प्रियंका गांधी यांनीही आपला लखनऊ दौरा अर्धवट सोडत दिल्ली गाठली. प्रियंका गांधी-वाड्रा यांना कोरोनाची सौम्य लक्षणे आढळली आहेत. देशपातळीवर कोरोना रुग्णवाढ कायम आहे. एका दिवसाआधी कोरोना रुग्णांमध्ये घट झाल्यानंतर पुन्हा कोरोना रुग्ण वाढले आहेत. देशात कोरोना रुग्णसंख्येत ४१ टक्क्यांनी वाढ झाली असून महाराष्ट्रात २७०१ नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार देशात कोरोना रुग्णसंख्येने मागील ९३ दिवसानंतर पाच हजारांचा टप्पा पार केला आहे. बुधवारी ५२३३ नव्या रुग्णांची नोंद करण्यात आली. या रुग्णसंख्येसह सध्या देशात २८ हजार ८५७ सक्रिय रुग्णांवर उपचार सुरू आहेत. काही दिवसांपासून देशात कोरोना संसर्गामध्ये वाढ होत आहे. महाराष्ट्रासह इतर राज्यांतही रुग्णसंख्येत वाढ होत असल्याचे दिसत आहे. हा नवा व्हेरिएंट ओमायक्रोनच्या वंशावळीतीलच असला तरी तो गंभीर स्वरूप धारण करणार नाही, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. मात्र आधीच अन्य आजारांनी ग्रस्त असलेल्या व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. या धोक्यापासून स्वत:चा आणि कुटुंबीयांचा तसेच आसपासच्या लोकांचा बचाव करायचा असेल, तर पुन्हा एकदा मास्क घालणे, सोशल डिस्टन्सिंगचे पालन करणे, वेळोवेळी हात स्वच्छ धुणे गरजेचे आहे. या नव्या संसर्गाचा वेग पाहता त्याला अटकाव करायचा असेल, तर गर्दी टाळायला हवी किंवा गर्दीच्या ठिकाणांमध्ये सर्वांनी मास्कचा वापर करायला हवा. गेल्या काही दिवसांपासून कोरोनाबाधित रुग्णांची संख्या वाढत आहे. ही बाब ध्यानी घेऊन राज्य शासन पुढील पंधरा दिवस सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवून आढावा घेणार आहे व नंतरच निर्बंध लादण्याबाबतचे निर्णय घेतले जातील असे दिसते. या सर्व हालचाली ध्यानी घेऊन जर पुन्हा निबंर्ध नको असतील, तर नागरिकांनी स्वत:हून शिस्त पाळणे ही काळाची गरज आहे.

# सहा वर्षात १७ जणांचा मृत्यू

## १५ मृत कुटुंबीयांना १.८७ कोटींची तर २०० जखमींना १.१५ कोटींची मदत

**गोंदिया:.** जिल्ह्यातील वनपरिक्षेत्रात अनेक गावांचा समावेश आहे. अनेकदा गावात, शेतात शिरून वन्यप्राणी मानवांवर हल्ले करतात. गत सहा वर्षात वन्यप्राण्यांचा हल्ल्यात १७ जणांना प्राणास मुकावे लागले आहे. दोनशेपेक्षा अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत.

गोंदिया जिल्हा वनांनी नटलेला आहे. नवेगावबांध, नागझिरा अभायारण्याचा जिल्ह्यात समावेश आहे. या अभयारण्यात मोठ्या प्रमाणात वन्यप्राण्यांचे वास्तव्य आहे. अनेकदा मानवी हस्तक्षेपामुळे किंवा भक्ष, पाण्याच्या शोधात वन्यप्राणी शेतशिवार, गावाकडे धाव घेतात. अशावेळी अनेकदा मानवांवर हल्ल्यांच्या घटना घडतात. गत सहा वर्षात वन्यप्राण्यांकडून मानवांवर हल्ले झाल्याच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. त्यात १७ जणांना प्राणास मुकावे लागले आहे तर २०० जण गंभीर जखमी झाले आहेत.

मृतांमध्ये अनेक जण कुटुंब प्रमुख असल्याने त्यांचे कुटुंब आर्थिक संकटाशी संघर्ष करीत आहेत. शासन नियमानुसार वनविभागातर्फे वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृतकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात आली आहे. असे असले तरी कुटुंब प्रमुखाची भरपाई आर्थिक मदतीतून होणे शक्य नाही. वनक्षेत्राला लागून असलेली गावे, शेतात मानवांवर वन्यप्राण्यांचे हल्ले होतच आहेत.

अनेकदा हे वन्यप्राणी गावात प्रवेश करून मानव-वन्यजीव संघर्ष पहावयास मिळतो. वर्ष २०१७-१८ मध्ये दोघांनी, २०१८-१९ व २०१९-२० मध्ये प्रत्येकी तीन जणांनी प्राण गमावला.

वर्ष २०२०-२१ मध्ये ४, वर्ष २०२१-२२ मध्ये ३ आणि वर्ष २०२२-२३ मध्ये २ अशा १७ जणांचा वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे.


यापैकी १५ मृतकांच्या परिजणांना १ कोटी ८७ लाख रुपयांची तर २०० गंभीर जखमींना १ कोटी १५ लाख ८३ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आल्याचे वन विभागाच्या सूत्रांनी सांगितले.

### वनविभागाने लक्ष देणे गरजेचे

**गोंदिया जिल्हा वनांनी नटलेला आहे. जिल्ह्यातील अभयारण्यात मोठ्या प्रमाणात वन्यप्राण्यांचे वास्तव्य आहे. उन्हाळ्याच्या दिवसात वन्यप्राणी शेतशिवार व गावाकडे धाव घेतात. अशावेळी अनेकदा मानवांवर हल्ल्यांच्या घटना घडतात. या घटनेत आता वाढ झाली आहे. त्यामुळे वनविभागाने याकडे लक्ष देणे गरजेचे झाले आहे.**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता ,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# पावसाळ्यात आरोग्य सांभाळा



सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु आहेत. पावसाच्या साचलेल्या दूषित पाण्यामुळे अनेक साथीचे रोग पसरतात. नकळत दूषित पाणी प्यायलं जातं. त्यामुळे आजारांना सामोरं जावं लागतं. पण दूषित पाणी प्यायलंमुळे जुलाब, उलटी, टायफॉइड, गॅस्ट्रो, विषाणू, जीवाणूंचे आजार, जंतूची वाढ यांसारखे आजार होतात. याची बहुतांश जणांना माहिती नसते. त्यामुळेच जलजन्य आजारांचे तोटे काय असतात हे देखील समजून घेतलं पाहिजेत.

दूषित पाण्यापासून पाच ते सहा प्रकारचे आजार होतात. त्यात गॅस्ट्रो हा पहिला आजार. गॅस्ट्रोच्या आजारात रुग्णाला उलटी, जुलाब होतात. दूषित पाणी प्यायल्यानंतर चार ते पाच तासात ही लक्षणं दिसू लागतात. पावसाळ्यात ही लक्षणं साथीच्या आजारासारखी पसरतात. उलटी, जुलाब झाल्याने शरीरातील पाण्याचं प्रमाण कमी होतं. रुग्णाला दूषित पाणी झाल्याने गॅस्ट्रो होतो. शरीरातील पाणी कमी झाल्याने अखेर रुग्णाला सलाइन लावण्याची वेळ येते.

दूषित पाण्याच्या माध्यमातून शरीरात विषाणूंचा प्रवेश होतो. जलजन्य आजारांमुळे पोटांचे विकार बळावतात. दूषित पाणी प्यायल्यानंतर एक ते दोन दिवसात खूप जुलाब सुरु होतात. पोटात खूप दुखतं, कळा येतात. तीन ते चार दिवसात प्रकर्षाने ताप येतो. त्यामुळे अनेकदा अॅन्टीबायोटिक्स देऊन रुग्णाला बरं केलं जातं. दूषित पाण्यामुळे काविळीसारखा तिसरा प्रकार होतो. काविळीमध्ये हेपेटायटिस मएफ किंवा मइफ हे प्रकार झाल्याचं आढळतात. हा आजार दूषित पाण्यातून होतो यावर विश्वास बसत नसला तरी ते सत्य आहे. दूषित पाणी प्यायल्यानंतर सात ते आठ दिवसात उलट्या, ताप, लघवी पिवळी होणं किंवा भूक मंदावणं ही लक्षणं दिसतात. त्याशिवाय चार ते पाच दिवसांनी डोळे पिवळे दिसायला लागतात. महिना ते दीड महिन्यात हा आजाराची लक्षणं कायम राहतात. ९० ते ९५ टक्के नागरिकांमध्ये हा आजार दिसून येतो. टायफॉईड हा आणखी एक आजार दूषित पाण्यामुळे होतो. चार ते पाच दिवसात मोठ्या प्रमाणात ताप येतो. पोटात खूप दुखतं. उपचार न घेतल्यास टायफॉइडचे जंतू रक्तात मिसळतात. यामध्ये काही रुग्ण दगावण्याची भीती असते.

**उपचार काय कराल ?**

पावसाळ्यात पाणी पिताना शुद्ध करुन पिणं हा सवीत्तम उपाय. त्याकरता विविध माध्यमांचा वापर करता येऊ शकतो. पाणी उकळून प्यावं. मेडिक्लोर ड्रॉप्स पाण्यात टाकल्यानंतर ते प्यावं. त्यामुळे पाण्यात साचलेली माती अथवा गाळ हा तळाशी जाऊन आपल्याला स्वच्छ पाणी मिळतं. पावसाळ्याच्या दिवसात बाहेरचं खाणं टाळावं. पाणीपुरी, भेळ अथवा इतर पदार्थ खाणं टाळलं पाहिजे. उलट्या, जुलाबांमुळे शरीरातील पाणी कमी होतं. त्यावेळी मीठ- साखर पाणी सतत पित राहावं. त्यामुळे शरीराला आराम मिळू शकतो. ओआरएस पावडर मिळते. ती एक लीटर पाण्यात टाकून प्यावी. नारळाचं पाणी घ्यावं. मात्र ग्लुकॉन डी अथवा कोल्ड ड्रींक्स घेणं या दिवसात टाळावं.

**उघड्यावरील खाणं टाळा**

आपल्या देशात बऱ्याच आगळ्यावेगळ्या गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्यातली एक गोष्ट आहे, रस्त्यावर विकले जाणारे उघडे खाद्य पदार्थ आणि ते आवडीनं खाणारे लोक. कापलेली फळं, पाणीपुरी, इडली, डोसा, वडापाव, पोहे असे पदार्थ विकणारे बरेच ठेले, हातगाड्या प्रत्येक गल्ली आणि चौकात दिसतात. या ठिकाणी उत्तर भारतापासून दक्षिण भारतीय पदार्थांपर्यंत आणि चायनीज पदार्थही मिळतात. असे खाद्य पदार्थ विकणारे माशा, कीटक, धूळ यांची भीडभाड न ठेवता, हे पदार्थ झाकण्याची तसदी न घेता दिवसाकाठी छान पैसे कमावतात. मुख्यतः हे पदार्थ चवदार, गरमागरम आणि स्वस्त असल्यामुळे त्यांचा आपल्या शरीरावर काय परिणाम होतो, याचा विचार न करता आपण आनंदानं खातो. हे पदार्थ उघडे आणि अस्वच्छ असल्यामुळे शरीरासाठी अतिशय हानिकारक असू शकतात. त्यामुळे टायफॉइड, गॅस्ट्रो, पोटदुखी, वारंवार पोट बिघडणं, अन्नातून विषबाधा असे विविध आजार होऊ शकतात. त्यातच गाड्यांमधून बाहेर पडणा?या कार्बनयुक्त धुराचे कण या अन्नावर बसून आपल्या पोटात जातात.

**आजारांपासून कसे वाचाल ?**

सर्वात महत्त्वाचं म्हणजे अशा ठिकाणी खाऊ नका. खाणं अगदीच टाळू शकत नसाल, तर निदान पुढील गोष्टींवर जाणीवपूर्वक लक्ष असू द्या-

**१) पदार्थ करणारी व्यक्ती**

अ. निरोगी आहे. (कपडे स्वच्छ आहेत, नखं कापलेली आहेत, अंगावर जखमा नाहीत)

ब. पदार्थ तयार करताना, देताना तंबाखू खात नाही किंवा सिगारेट ओढत नाही.

**२) वापरलेलं पाणी**

अ. पिण्याचं पाणी आहे.

ब. पाणी झाकलेल्या भांड्यात साठवलेलं आहे आणि ते घेण्यासाठी भांड्याला नळ आहे.

क. बर्फ स्वच्छ आणि बंद पेटीत साठवला जातो.

**३)वापरण्यासाठी आणि साठवण्यासाठीची भांडी**

अ.भांडी स्वच्छ आहेत.

ब. वाढण्याचं काऊंटर आणि टेबल स्वच्छ आहे.

**नष्ट करण्याजोगी भांडी वापरा**

४) सर्वांत महत्त्वाचं म्हणजे या ठिकाणी उघडं गटार, कचरापेटी किंवा स्वच्छतागृह नसावं. उघड्यावरचं खाणं आरोग्यासाठी वाईट आहे, हे लक्षात

घेऊन आपल्या मुलांना त्याची माहिती द्या. निरोगी राहा.

**श्री प्रशांत खरात**
**जिल्हा आय.ई.सी अधिकारी**
**जिल्हा परिषद, गोंदिया**

# धर्मवेडी: उलट्या काळजाची माणसं

उलट्या काळजाची माणसं आपल्याच धर्मबांधवांना पिढ्यान् पिढ्या गंडवत आलेले आहेत. धर्माच्या बुरख्याआड हे सर्व काही चालू आहे. पुरोहितशाहीमुळे रग्गड बनलेली बटूवामनाची ही वंशावळ ओबीसी, दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक यांच्या अहिताची एकही संधी सोडत नाही. ओबीसी समाजाकडून जातवार जनगणनेची मागणी वाढत असताना, भुरटे वामन ओबीसीबद्दल राज्य सरकारवर तोंडसुख घेण्यास सरसावले आहेत. तर त्यांच्या पंजात फसलेले मभोंगा-चालिसाफच्या नावे बोंबा मारत ओबीसींना भुलवण्याची कारस्थाने रचत आहेत. सद्यस्थितीत ओबीसी मात्र कुणालाही बधत नाही.

खरं तर आज ओबीसी आरक्षणाचा ज्या पद्धतीने अव्हेर केला जात आहे. ती बाब काही आता नवीन नाही. १९९० ला ओबीसीसाठी मंडल आयोगाच्या शिफारशी लागू झाल्या, त्यावेळीदेखील ओबीसीचे लक्ष आरक्षण मुद्यावरून वळवण्यासाठी मंदिर-मशीद वादाला प्रचंड हवा दिल्या गेली. ब्राह्मणेतरातील लालकृष्ण अडवाणी नावाचा फुगा फुगवून देशभर रथावरुन फिरवण्यात आला. प्रसारमाध्यमांनी त्या फुग्यात अतोनात हवा भरली. आज मभोंगा-चालीसाफ या वृत्तांना ज्या पद्धतीने कव्हरेज-स्पेस मिळतो, अगदी तसेच त्या वेळी घडत होते. तर दुसरीकडे ज्या व्ही. पी. सिंगांनी काँग्रेसची सत्ता उलटवून नवा राजकीय पर्याय दिला, ते प्रचंड लोकप्रिय झालेले प्रधानमंत्री मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करताच शत्रूवत वाटू लागले. व्हिलन-राक्षस म्हणून त्यांची भर्त्सना आणि बदनामी प्रचार माध्यमातून उच्चवर्णीय पितपत्रकारिता करत राहिली. व्ही. पी. सिंग यांना रावण संबोधून त्यांच्या प्रतिमेचे दहन केले गेले. आजही परिस्थिती फार वेगळी नाही. महाराष्ट्रातील विरोधी पक्ष त्यांची केंद्रात सत्ता असूनही ते केंद्राकडे जनगणनेची मागणी न करता, केंद्राकडे जनगणनेचे अधिकार असताना, ओबीसीची जातीनिहाय जनगणनेची मागणी अनुल्लेखाने मारून राज्य सरकारवर वारेमाप आगपाखड करत आहे. ओबीसींना आपल्या निखळ विरोधाचा थांगपत्ता लागू नये म्हणून जेद्दोजेहाद करताना दिसतात. आणि तिकडे भोंगा-चालीसा वालेही उभे करतात. भोंगा-चालीसा मागील राजकारण असे ओबीसीच्या हक्काच्या-अधिकाराच्या मुळावर घाव घालणारे आहे.

ओबीसीच्या राजकीय आरक्षणावर गदा आल्यानंतर, राज्य सरकारद्वारे गठीत समर्पित आयोग इंपिरीकल डाटा गोळा करण्याकरिता प्रयत्न करत आहे. ओबीसी-एससी-एसटी-एनटी आदि अनेक संघटनांनी समर्पित आयोगाच्या भेटी घेऊन 'ओबीसीची जातवार जनगणना करा' ही मागणी पुन्हापुन्हा रेटलेली दिसते. एकीकडे ओबीसी आरक्षणासाठी एवढा मोठा आक्रोश व्यक्त होत असताना, ओबीसींच्या आरक्षणाचे छुपे वैरी उघडपणे निवेदनाच्या माध्यमातून आयोगाकडे ओबीसी आरक्षणाला विरोध दर्शवत असल्याचे उघड होते आहे. त्यासंदर्भात ब्राह्मण समाजातील अनेक संघटनांनी पत्रके काढून आपले पोटातील शत्रुत्व ओठातून उघड केले. तथापि ओबीसी धार्मिकदृष्ट्या वर्णव्यवस्थेत ब्राह्मणांच्या मानसिक गुलामगिरीत फसलेला असल्यामुळे अशा प्रकारचा ओबीसींच्या आरक्षणाला विरोध होत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया समाज माध्यमातून व्यक्त होत असताना दिसते.

ओबीसीच्या हक्काला विरोध करताना आणखी एक महत्त्वाची बाब ध्यानात घेण्यासारखी आहे. ती बाब म्हणजे परधर्मद्वेष होय. ओबीसी जेव्हा जेव्हा जागृतपणे हक्कासाठी, न्यायासाठी, लढायला तयार होण्याच्या पवित्र्यात येतात, नेमके त्याचवेळी धार्मिक तेढ वाढवणारे शस्त्र उपसले जाते. ओबीसी धर्माच्या-चातुर्वर्ण्याच्या मगरमिठीतून सुटणार तर नाही, याचे भय विरोधकांना अधिक सतावत असते. ओबीसी- व्हीजे-एनटी यांच्या मागासलेपणावर उच्चवर्णीयांचा जात वर्चस्वाचा डोलारा डौलाने खडा आहे. या जातवर्चस्वाला नख लागू नये म्हणून अशी कारस्थानं रचली जातात. त्याचाच अग्रक्रमावरील कार्यभाग म्हणजे मुस्लिमद्वेष पेरुन ओबीसीचा खरा पारंपरिक हितशत्रू दडविण्याचा हा द्राविडी प्राणायाम प्रकार होय. मुस्लिमांचा द्वेष म्हणजे एकप्रकारे ओबीसींचा तिरस्कार-घृणा होय. कारण भारतातील ९० टक्के मुस्लिम हे धर्मांतरीत आहेत. त्यांचे व्यवसाय ओबीसीतील जातीप्रमाणे आहेत. ओबीसीसारखे मुस्लिमही अतिशय मागास-गरीब आहेत. बेरोजगारी दारिर्द्य निरक्षरता, धर्मभोळेपणा, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा या बाबतीत ओबीसीसमान आहेत. याच शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक मागासपणाच्या निकषांनुसार मंडल आयोगाने देशभरातील ११५ मुस्लिम व्यवसायिक जमातींचा ओबीसीमध्ये समावेश केला आहे. इस्लाममध्ये तर जातीव्यवस्था नव्हती.मग या मुस्लिम जाती कुठून आल्यात? इस्लामचा पाया बंधूभावावर आधारित आहे, याचा अर्थ हे ओबीसी बांधव ब्राह्मणी वर्चस्वामुळे, विषमतेमुळे, धर्मातील हीन वागणुकीमुळे, मंदिर प्रवेशबंदीमुळे, शिक्षणाला मनाई असल्यामुळे इत्यादी कारणांनी कंटाळून इस्लाममधील सण-उत्सव मशिदीतील खुल्या वातावरणात धार्मिक-स्वातंर्त्याच्या कामनेने धर्मांतरित झालेत. इस्लाममध्ये धर्माच्या बाबतीत जबरदस्ती करू नये असा दंडक आहे. त्यामुळे तलवारीच्या जोरावर धर्मांतर करून घेतल्याच्या वल्गना कुचकामी ठरतात. आपल्या धर्मातील अमानवी अत्याचारावर पांघरूण घालण्यासाठी ही इस्लामवर बदनामीची राळ उडवणे नव्हे काय?

तीस-पस्तीस वर्षांपूर्वी रमजान, मोहरम, ईद याप्रसंगी ओबीसींचा या उत्सवांमध्ये सहभाग लक्षणीय राहत असे. समाज धर्मनिरपेक्ष होता. हिंदुत्वाच्या नावाखाली ओबीसींच्या मंडल आयोग आंदोलनाला विरोध करणाऱ्यांनी मुस्लीमविरोध वाढवून मुस्लिम-ओबीसी दरी निर्माण केली. धर्मांध शक्तींनी गावगाडा नासवला. हीच खऱ्या अर्थाने ओबीसीमधील बंधुभाव तोडण्यासाठी वापरण्यात आलेली शक्कल होय. मंडलचा लढा यशस्वी होऊ नये म्हणून बाबरीचा वाद, हिंदुत्व हे ओबीसीविरोधी मुस्लिमविरोधी षडयंत्र लोकांच्या आता लक्षात येत आहे. ओबीसी जातिनिहाय जनगणनेच्या मागणीने ओबीसी लढा अधिक सघन होत आहे. त्यामुळे ओबीसीचा वापर मुस्लिम- दलितविरोधी दंगलीत करणे आता चाणक्यांना अवघड होत आहे. महाराष्ट्रात 'भोंगा-चालिसा' या आयुधांचा सामाजिक दुही पसरवण्याठी केलेला प्रयत्न विफल ठरला. ओबीसीची बेरोजगार फौज भोंग्यामुळे गोंधळली नाही, की हनुमान चालिसेमुळे चवताळली नाही. भावुक झाली नाही. ही ओबीसी चळवळीची फार मोठी उपलब्धी होय. उलट भोंगा-चालीसा वादाकडे पाठ फिरवून ओबीसीच्या शेकडो संघटना आणि हजारो कार्यकर्ते उन्हातान्हात ओबीसीसाठी नियुक्त केलेल्या समर्पित आयोगाच्या भेटीला येऊन निवेदन देतात. "ओबीसीची जातवार जनगणना करा!" असे आग्रही प्रतिपादन करतात. यावरून ओबीसीची दिशा आता बदलत आहे, हे काळजीपूर्वक ध्यानात घेतले पाहिजे. दिशा बदलली की दशा बदलेल. आणि ओबीसी लढा आरक्षणाच्या मार्गावरून सांस्कृतिक संघर्षाच्या लक्ष्याकडे अग्रेसर होईल. असे हमखास वाटू लागेल. उलट्या काळजाच्या माणसांना हे पचणी पडणे कदापि शक्य नाही, म्हणून त्यांच्या उलट्या बोंबा मारणे चालू आहे, पण त्याही निष्फळ ठरत आहे.

**-अनुज हुलके**

## धान गिरणीच्या तत्कालीन अध्यक्षाला अटक

**गोंदियाः** गोरेगाव येथील नेहरू सहकारी धान गिरणीअंतर्गत २०१८-१९, २०१९-२० मध्ये धान खरेदी व्यवहारात तीन कोटी ७७ लाख ९८ हजार ६०० रुपयांचा अपहार झाल्याचे लेखापरीक्षणात उघड झाल्यानंतर, त्याबाबतची तक्रार गोरेगाव पोलिसांत करण्यात आली होती. पोलिसांनी या प्रकरणी धान गिरणीचे तत्कालीन अध्यक्ष रेखलाल टेंभरे यांना सोमवारी (ता. १३) रात्री अटक केली आहे.

अन्य आरोपींचा शोध सुरू असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले.आरोपी तत्कालीन अध्यक्ष रेखलाल टेंभरे यांना पोलिसांनी अटक केल्यानंतर न्यायालयात हजर केले. न्यायालयाने टेंभरे यांना २० जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

वर्धा येथील सहकारी संस्थेच्या विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ (सहकार व वस्त्र उद्योग) श्रीमती एस. बी. लोखंडे यांनी लेखापरीक्षण केले. या लेखापरीक्षणात नेहरू सहकारी धान गिरणीअंतर्गत सुमारे तीन कोटी ७७ लाख ९८ हजार ६०० रुपयांचा अपहार झाल्याचे विशेष लेखापरीक्षकांनी तपासणी अहवालात नोंदविले आहे.

# दृष्टीदान सप्ताह

सुप्रसिद्ध नेत्रविशारद डॉ. आर. ए. भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस 'दृष्टिदान दिन' म्हणून साजरा केला जातो. मृत्यूनंतर नेत्रदान करावे, याच्या प्रसारासाठी स्वयंसेवी संस्था पुढे सरसावत आहेत. आज २१ व्या शतकातील विज्ञान इतके पुढे गेले आहे, की एका व्यक्तीचे डोळे आणि पर्यायाने त्याची दृष्टी घेऊन ते दुसऱ्याला म्हणजे ज्या व्यक्तीला दृष्टी नाही, अशा व्यक्तीला सहज देता येतात.

डोळे ही ईश्वराने मानवाला दिलेली फार मोठी देणगी आहे. परंतु, काही व्यक्ती यापासून वंचित असतात. काही कारणास्तव त्यांना अंधत्व प्राप्त होते. त्यामुळे अशा व्यक्ती जगाचे सौंदर्य पाहू शकत नाहीत, सौंदर्याने भरलेली सृष्टी ज्यांना पाहता येत नाही. या व्यक्तींना नेत्र मिळाले, तर ते सृष्टीचा आस्वाद घेऊ शकतील. परमेश्वराने माणुसकी या नात्याने दृष्टी असणाऱ्या व्यक्तीने दृष्टिहीन व्यक्तीला नेत्रदान केले, तर दात्याच्या जीवनाचे नक्कीच सार्थक होईल. एकंदरित काय, दृष्टी ही फार महत्त्वाची आहे. कलियुगात दानाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. अवयवदान, रक्तदान, नेत्रदान आदींना फार महत्त्व आहे.

भारत सरकारने यासाठी विविध योजना हाती घेतल्या आहेत. दृष्टिविकार प्रतिबंधक आणि अंधत्व नियंत्रण कार्यक्रम हा शंभर टक्के केंद्र सरकार पुरस्कृत असून, अनेक नेत्रपेढ्या, फिरती नेत्रपथके कार्यरत आहेत. राज्यात सुमारे नऊ लाखांपेक्षा जास्त अंध व्यक्ती असून, या नेत्रदान जागृतीमार्फत लाखो व्यक्तींना दृष्टी प्राप्त होऊ शकते. नेत्रदान हे सर्वश्रेष्ठ दान मानण्यात आले आहे. शिवाय नेत्रदान हे मृत्यूनंतर करायचे असल्याने कसलीच भीती नाही. नेत्रदानासाठी व्यक्तीच्या मृत्यूनंतर दोन तासांच्या आत डोळे काढले पाहिजेत.



ज्या लोकांना बुबुळाच्या विकारामुळे अंधत्व आले आहे. अशा लोकांना नेत्रदानाचा फायदा होतो. त्यालाच कॉर्नियल ब्लाइंडनेस असे म्हणतात. नेत्रदानानंतर केवळ डोळ्याच्या बुब्बुळाचे प्रत्यार्पण केले जाते. पूर्ण डोळा बदलला जात नाही.

**बुब्बुळ (कॉर्निया) म्हणजे काय?**

घडळयाच्या तबकडीवर ज्याप्रमाणे संरक्षक काच असते, त्याचप्रमाणे डोळ्यामध्ये पूर्ण पारदर्शक आवरण असते. त्यामुळे डोळ्यांचे संरक्षण होते. मुख्यतः बाहेरील प्रकाशकिरण डोळ्यात जाऊन दृष्टी प्राप्त होते. ज्यावेळी हे पारदर्शक बुब्बुळ अपारदर्शक होते, तेव्हा साहजिकच अंधत्व येते.

**अंधत्वाची कारणे**

डोळ्याला होणारी इजा उदा. बुब्बुळाला होणाऱ्या जखमा, असंरक्षितरित्या पेटविलेले फटाके, कुपोषणामुळे, इन्फेक्शन (जंतू प्रादुर्भाव) मुळे, देवी, कांजिण्या, इ. विकारामुळे, डोळयात काही केमिकल्स गेल्यास व अनुवंशिकता या कारणांमुळे अंधत्व येऊ शकते.

**नेत्रदान कोण करू शकतो?**

नेत्रदान केवळ मृत्यूनंतर करता येते. बालकापसून वृध्दांपर्यंत कोणतीही व्यक्ती नेत्रदान करू शकते.

ज्यांना चष्मा आहे, ते सुध्दा नेत्रदान करू शकतात. ज्यांना ब्लडप्रेशर, डायबिटीस, दमा, इ. विकार असतील व मोतीबिंदू शस्त्रक्रिया झालेली व्यक्ती सुध्दा नेत्रदान करू शकतात.

**नेत्रदान कोण करू शकत नाही?**

एड्स, हिपेटेटिस (लिव्हरचे आजार), सेप्टिसिमिया (रक्तातील जंतू प्रादुर्भाव), ब्लड कॅन्सर, इ. आजार झालेले रुग्ण नेत्रदान करु शकत नाहीत.

**नेत्रदानाच्या वेळी घ्यावयाची काळजी -**

मृत व्यक्तीस ज्या खोलीत ठेवले आहे. तेथील पंखा बंद करावा. त्याचे डोळे बंद करून डोळयावर ओला कापूस अथवा ओला रुमाल ठेवावा व डोक्याखाली जाड उशी ठेवावी. आपल्या डॉक्टरांकडून डेथ सर्टिफिकेट (मृत्यूचा दाखला) तयार ठेवावा. डोळ्यातील बुब्बळ मृत्यूनंतर सहा तासाच्या आत काढावे लागतात. जरी मृत व्यक्तीने नेत्रदानाचे इच्छापत्र भरले नसेल, तरीही नातेवाईकांना त्या व्यक्तीचे नेत्रदान करता येते.

**नेत्रपेढीचे काम -**

नेत्रदानाचा फोन आल्याबरोबर नेत्रपेढीचे तज्ज्ञ डॉक्टर त्वरित जाऊन रुग्णाचे बुबुळे काढून नेतात. त्यावेळी नेत्रदात्याचे रक्तही तपासणीसाठी काढले जाते.नेत्रदानाने चेहरा विद्रूप होत नाही. दान केलेले नेत्र सुरक्षित रित्या नेत्रपेढीत नेऊन त्याची तपासणी करून योग्य त्या रुग्णावर आरोपण केले जाते. एका व्यक्तीच्या नेत्रदानाने दोन अंध व्यक्तींना दृष्टी प्राप्त होते. तरी आजच नेत्रदानाचा संकल्प सोडा व इतरांनाही त्यासाठी प्रवृत्त करा.

मोतीबिंदू, दृष्टिदोष, अजीवनसत्त्वाचा अभाव, बुबुळाचे विकार, बुबुळाची अपारदर्शकता ही अंधत्वाची कारणे पहायला मिळतात. या प्रकारचे अंधत्व हे तात्पुरत्या स्वरूपात मोडते. हे अंधत्व दूर करता येणे शक्य आहे. काचबिंदू नेत्रपटल विकृती यामुळे कायमस्वरूपी विकृती येऊ शकते. जगातील एकूण अंधांपैकी भारतात एक चतुर्थांश अंध आहेत. या आकडेवारीत वर्षानुवर्षे वाढच होत आहे. यासाठी वेळीच उपाययोजना व्हायला हवी.

भारतात असणा-या एकूण दीड कोटी अंधांपैकी सुमारे ९० टक्के व्यक्ती या ४५ पेक्षाही कमी वयोगटातील आहेत. भारतात दरवर्षी १२ ते १३ दशलक्ष व्यक्ती मृत होतात. यापैकी केवळ ७,५०० लोकच नेत्रदान करतात. ही तफावत दूर होण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. डोळ्यांच्या बाह्य आवरणांपैकी एक षष्ठांश भागाला बुब्बुळ म्हटले जाते. बुबुळ हे घड्याळाच्या काचेप्रमाणे एक पारदर्शक पटल आहे. प्रकाशची पटले दृष्टिपटलावर एकत्रित करण्याचे प्रमुख कार्य बुबुळ करते. डोळ्यांना बुबुळांमुळे संरक्षण मिळते. ज्या कारणांमुळे प्रामुख्याने अंधत्व येऊ शकते त्यात जंतुसंसर्ग, मार लागणे, शस्त्रक्रियेची गुंतागुंत, शस्त्रक्रियेनंतर आरोग्याची काळजी, कुपोषण, आनुवंशिकता, भोंदू-वैदूंकडून केले जाणारे उपचार यामुळे बुबुळ खराब होऊन अपारदर्शकता प्राप्त होते. यावर बुबुळ प्रत्यारोपण शस्त्रक्रिया हे फार मोठे वरदान आहे. या शस्त्रक्रियेत अपारदर्शक बनलेले बुबुळ काढून त्याजागी मरणोत्तर नेत्रदान करणा-या व्यक्तीचे बुबुळ प्रत्यारोपित करण्यात येते. यामुळे रुग्णाला पुन्हा दृष्टी मिळते. डोळ्याचा आकार स्थिर ठेवण्यासाठी किंवा बुबुळाच्या ब-या न होणा-या आजारांसाठी करण्यात येते. संकलित केलेली बुबुळे ४ डिग्री तापमानात एक विशिष्ट रसायन असणा-या बाटलीत ४८ तासांपर्यंत ठेवता येतात. तसेच इतर विशेष रसायनांमध्ये ते बुबुळ दोन ते तीन ते आठवड्यांपर्यंत सुरक्षित ठेवता येतात.

नेत्रदानासाठी काय हवे? मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा १९९४ मध्ये पारित करण्यात आला. या कायद्याच्या आधारे एमबीबीएस नोंदणीकृत डॉक्टरच नेत्रसंकलन करु शकतात. हे नेत्रसंकलन घरी, रुग्णालयात, स्मशानभूमीत वा इतरत्रही करण्यात येते. नेत्रसंकलनासाठी दहा ते पंधरा मिनिटांचा कालावधी लागतो. प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यादीही नेत्रपेढीकडे तयार असते.

नेत्रदानाची सर्व माहिती गुप्त ठेवण्यात येते. बुबुळ प्रत्यारोपित व्यक्तीला याबाबत काहीही माहिती देण्यात येत नाही. मृत्युपूर्व नेत्रदानाचा संकल्प नसला तरीही मृतांच्या जवळील नातेवाईकही यासाठी संमती देऊ शकतात. यात महत्त्वाची बाब ही की पूर्ण डोळा प्रत्यारोपित केला जात नाही तर केवळ बुबुळ प्रत्यारोपित करण्यात येते. नेत्रदानामुळे मृताच्या चेहऱ्यावर कुठेही विद्रूपता येत नाही.

नेत्रदानाबाबत समाजात आजही काही अंधश्रद्धा आहेत. या दूर व्हायला हव्यात. यामध्ये डोळ्याच्या जागी खड्डा पडणे, पुढच्या जन्मी येणारे अंधत्व, अतिवृद्ध व्यक्तीचे डोळे नेत्रदानासाठी योग्य नसणे, नेत्रदान खचीक बाब असल्याचा समज, नेत्रदानात धर्म किंवा जातीचा येणारा अडसर, अंत्यविधीला विलंब होणे यासारखे खोटे समज समाजमनावरून पुसले जायला हवेत.

**कसे होते नेत्रदान-**

नेत्रपेढीची भूमिका महत्त्वाची असते. नेत्रदात्याचे मरणोत्तर नेत्र संकलन करणे हे या पेढीचे प्रमुख कार्य, नेत्रदात्याची मरणोत्तर रक्ततपासणी एचआयव्ही व हिपेटायटिससाठी करण्यात येते. सूक्ष्म यंत्रांच्या माध्यमातून या बुबुळांची तपासणी करून त्यांची प्रत्यारोपणासंदर्भात योग्यता तपासण्यात येते. नेत्रदानाबाबत कॉल आल्यानंतर संबंधित रक्तपेढीच्या डॉक्टारांची टीम त्वरित त्या ठिकाणी पोहोचते. यामुळे अंत्यविधीला कोणत्याही प्रकारचा विलंब होत नाही.

अन्नदान यापेक्षा जर नेत्रदान करून एखाद्या अंध व्यक्तीला दृष्टी दिली, तर आयुष्यात आपल्या कर्तबगारीने दाता खूप मोठा होईल. त्याच्या हातून कदाचित समाजकार्यदेखील घडेल.

१० जून हा जागतिक दृष्टिदान दिन म्हणून साजरा केला जातो, कारण त्या दिनाचे औचित्य साधून दृष्टिदानाचे स्मरण राहील. त्यामुळे मरणोत्तर नेत्रदानाची इच्छा असणाऱ्या व्यक्ती आताच नेत्रपेढीत जाऊन विहित नमुन्याचा फॉर्म भरून दिला, की मरणोत्तर नेत्रदानाचे कार्य सत्कारणी लागेल.

दृष्टी नसेल तर जीवन अंध:कारमय बनते. दृष्टीहिनतेमुळे आज कोट्यवधी लोक हे सुंदर जग बघू शकत नाहीत. या अंधांचे जीवन सुखकर बनण्यासाठी नेत्रदानाची चळवळ देशात उभी राहिली. त्याविषयी सातत्याने जागृती केली जाते. नेत्रदानाचा संकल्प अनेकजण करतात. मरणोत्तर नेत्रदानाची चळवळ हळूहळू वाढते आहे. त्याचे प्रमाण वाढण्याची गरज आहे. प्रत्यक्षात बायपटल रोपणाची मागणी आणि होणारा पुरवठा यात तफावत आहे. ती दूर झाल्यानंतरच चळवळ खऱ्या अर्थाने यशस्वी होईल.

**(डॉ.एस.एफ. देशमुख)**
**प्राचार्य,आरोग्य व कुटूंब कल्याण,प्रशिक्षण केंद्र कोल्हापूर**

# क्षणिक दिखावा न करता शाश्वत विकासासाठी प्रयत्नरत रहा–मुकाअ पाटील



## संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय तपासणी

**गोंदिया:–** केवळ स्पर्धा किंवा पुरस्कारासाठी क्षणिक दिखावा न करता गावाचा शाश्वत विकास कसा होईल यासाठी सर्वच नागरिकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी केले.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन २०२०–२१, २०२१–२२ अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा अनुषंगाने जिल्हास्तरीय तपासणी समितीच्या वतीने अंतिम जिल्हास्तरीय तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या वतीने करण्यात आली. यावेळी ते ग्रामपंचायती मध्ये आयोजित कार्यक्रमात बोलत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दिनांक ७ जून ते ९ जून दरम्यान गोंदिया तालुक्यातील गंगाझरी, तिरोडा तालुक्यातील नहरटोला, नवेझरी, गोरेगांव तालुक्यातील सटवां, बबई, आमगाव तालुक्यातील सोनेखारी, सडक अर्जुनी तालुक्यातील कोहळीटोला, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील पवणी/धाबे, कवठा, निमगाव तसेच जनवा या गावांची तपासणी करण्यात आली.

यावेळी समिती सदस्यसचिव म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता नरेश भांडारकर, समिती सदस्य म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत गोविंद खामकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे, शिक्षणाधिकारी प्राथ. कादर शेख, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता जतपेले, महिला व बालकल्याण विभागाचे विनोद जाधव,गट विकास अधिकारी विलास निमजे,विस्तार अधिकारी जि. टी. सिंगणजूडे संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान समन्वयक भागचंद्र रहांगडाले यांच्यासह जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे अतुल गजभिये, तृप्ती साकुरे, शोभा फतिंग, राजेश उखळकर, गटविकास अधिकारी,सरपंच श्रीमती पपीता नंदेश्वर, उपसरपंच पराग कापगते उपस्थित होते. विस्तार अधिकारी आदि उपस्थित होते. तपासणी दरम्यान परिशिष्ट २ च्या अनुषंगाने गावचे मूल्यांकन करण्यात आले. तपासणी दरम्यान समितीच्या वतीने शाळा व आंगणवाडी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राची पाहणी करण्यात आली.

# वनविभाग व वन अधिकाऱ्यांना आवाहन

## उपोषणकर्त्यांची घेतली भेट



**गोंदिया :** आपल्या न्याय व हक्क मागण्यांना घेऊन सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती व ग्राम संघ यांनी वनहक्क धारकाच्या न्याय मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाची माहिती मिळताच माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी उपोषण मंडपास भेट देत उपोषणकर्त्यांच्या मागण्या ऐकुन घेतल्या. वनविभागाने वनहक्क धारकांच्या हक्कावर गदा आणू नये, अन्यथा आदिवासी समाज पेटला तर सावरणे कठीण होईल, असा इशारा वनविभाग व अधिकाऱ्यांना दिला आहे.

यावेळी माजी मंत्री राजकुमार बडोले यांना उपोषणकर्त्यांनी आपल्या मागण्यामध्ये वनहक्क कायदा २००६ अन्वये गठीत ग्रामसभा परसटोलाचे वनहक्क कायद्याची पायमल्ली करीत तेंदुपाने वाहतुक करीत असताना अवैधरीत्या अडवणुक करून जप्त केलेल्या कारवाईचे लेखी दस्तावेज वनविभागाने ग्रामसभा परसटोलाला पुरवण्यात यावे. वनहक्क पासुन वंचित ठेवुन अन्याय व अत्याचार आणि मानसिक त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करावे. जप्तीवाहन वनविभागाने ग्रामसभेत सुपूर्द करावा. नुकसान भरपाई देण्यात यावी आदी मागण्या करण्यात आल्या.

यावेळी माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी वनविभागाचे प्रधान सचिव नायकवडे, उपवनसंरक्षक कुलराज सिंग यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून उपोषणकर्त्यांच्या मागण्या पुर्ण करावे तसेच उपोषणस्थळी प्रकाष्ठ निष्कासन अधिकारी राऊत यांच्याशी चर्चा करुन मार्ग काढण्याच्या सुचना केल्या. याबाबत विशेष चौकशी केली असता, ग्राम संघाला वनहक्क कायदा २००६ अन्वये सामुहीक वनहक्क प्राप्त असुन त्याअंतर्गत तेंदुपाने संकलन करण्याचा अधिकार ग्रामसंघाला प्राप्त असताना वन अधिकारी यांनी खाजगी कंत्राटदाराच्या मदतीने ग्रामसंघाचा तेंदुपाने वाहन अडवून ताब्यात घेतला व चोरीची बनावट केस तयार केली.

विशेष म्हणजे ज्या वाहन क्रमांक एमएच ४० सीडी १२७५ वनविभागाने जब्त केला त्यातील तेंदुपाने पंचनामा न करता गायब करण्याचा प्रताप वनविभागाने केला. अशा अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी, यासाठी १० गावातील आदिवासी समाज उपोषण करीत असुन त्यापैकी तीन उपोषणकर्त्यांची स्थिती गंभीर आहे. तरी याबाबत त्वरीत तोडगा काढावा व दोषींवर कार्यवाही करावी असे आव्हान माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी केले. याप्रसंगी पंचायत समितीच्या सभापती सविता कोडापे, उपसभापती होम राज पुस्तोडे, नवेगावचे उपसरपंच रघुनाथ लांजेवार व उपोषणकर्ते उपस्थित होते.

# अन...चक्क शिक्षणाधिकाऱ्यांनी केली पोषण आहाराची तपासणी!



**गोंदिया:–** जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये निकृष्ट दर्जाचा पोषण आहार वितरीत केला जात असल्याच्या अनेक तक्रारी असल्याने चक्क शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख यांनी शाळांना भेटी देऊन चक्क पोषण आहाराची तपासणी करून पोषण आहार योग्य की अयोग्य याची खात्री करून घेतली.

सध्या शाळा बंद आहेत. मात्र शाळेत पोषण आहाराचा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे शाळा उघडल्यानंतर पोषण आहाराची गुणवत्ता कशी आहे हे पाहणे गरजेचे असल्याने दिनांक ७ जून रोजी गोरेगांव तालुक्यातील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा सटवा येथे भेट देऊन प्रत्यक्ष पोषण आहाराची तपासणी केली. दिनांक ८ जून रोजी गोरेगांव तालुक्यातील बबई, आमगाव तालुक्यातील सोनेखरी तसेच ९ जून रोजी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील पवनी धाबे येथील शाळांना शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी भेटी देऊन पोषण आहाराची तपासणी करून आहार योग्य असल्याची खात्री करून घेतली.

## राणी दुर्गावती पुतळ्याचे अनावरण

**अर्जुनी मोरगाव–** तालुक्यातील सिरेगाव बांध येथे गोंडवाना आदिवासी समाज संघटनेच्यावतीने स्थानिक बिरसा मुंडा सभागृहात राणी दुर्गावती यांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा पार पडला.महिला फोरमच्या तालुकाध्यक्ष नाशिका कोडापे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाचे ध्वजारोहण गोंडवाना महासभेचे राष्ट्रीय सचिव दिवाकर पेंदाम त्यांनी केले.

# क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांच्या पुण्यतिथीनिमित्त सभामंडपाचे भूमिपूजन



**गोरेगांव:–** आदिवासी जननायक क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांच्या १२२ वी पुण्यतिथी निमित्त ग्राम तिल्ली(मोहगाव) येथे खासदार सुनिल मेंढे यांच्या स्थानिक निधीतून सभामंडपाच्या बांधकामाचे भूमिपूजन टोपराम मेंढे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद सदस्य डॉ. लक्ष्मण भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रम स्थळी जननायक क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांच्या पुतळ्यास मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केले.प्रमुख पाहुणे जिल्हा परिषद सदस्य ससेंद्र भगत,पंचायत समिती सदस्य रमेश पंधरे, पंचायत समिती सदस्य रामू माहारवाडे, सरपंच ओमा पटले, तंटामुक्ती अध्यक्ष दादूजी गावड, पंधराम गुरुजी तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

# १८२ ग्राम पंचायतीवर २.८४ कोटीचे वीज देयके थकीत

**गोंदिया:** महावितरणवर थकबाकीचा डोंगर दिवसेंदिवस वाढत असल्याने डबघाईस येण्याच्या मार्गावर आहे. महावितरणकडून वसुली मोहिम राबविण्यात येत असूनही पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नसल्याने महावितरणची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत आहे. त्यातच जिल्ह्यातील १८२ ग्राम पंचायतीवर विज बिलाचे २ कोटी ८४ लाख ६१९८ रुपए थकीत आहेत. यामुळे या गावातील पथदिव्यांचा विज पुरवठा खंडीत करण्यात आला आहे. विज पुरवठ्याअभावी पावसाळ्यात ग्रामीणांची चांगलीच कोंडी होणार आहे.

गावात लावण्यात येणाऱ्या पथदिव्यांचा विज बिलांचा प्रश्न मागील काही दिवसांपासून चांगलाच चर्चेत आला आहे. गावातील पथदिव्यांचा विज बिल जिल्हा परिषदेकडून भरण्यात येत होते. परंतु, शासनाने यावर बंदी आणली. त्यामुळे विज भरणे ग्राम पंचायतीला भाग पडले. परंतु, महिन्याकाठी येणारा भरमसाठ विज बिलाने ग्राम पंचायतीने गणित बिघडविले. आणि थकीत बिल वाढत गेला. त्यातही विज बिल भरणा करणे ग्राम पंचायतींना अशक्य होत असल्याने कोंडी निर्माण झाली. या सर्व प्रकारावर शासनाकडून कोणतेही ठोस पाऊल उचलण्यात आले नाही. तर दुसरीकडे महावितरणकडून बिल वसुली न झाल्याने १८२ ग्राम पंचायतीतील पथदिव्यांचा विज पुरवठा खंडीत आला. पुरवठा खंडीत करण्यात आलेल्या १८२ ग्राम पंचायतीवर महावितरणचे २ कोटी ८४ लाख ६१९८ रुपए थकीत आहेत.

# नागपूर विभागात गोंदिया अव्वल;जिल्ह्याचा निकाल ९७.३७ टक्के

**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च–एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल बुधवारी (ता. ८) ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात आला. या निकालात मुलींनीच बाजी मारली असून, त्यांच्या निकालाची टक्केवारी ९८.२२ टक्के इतकी आहे. नागपूर विभागात गोंदिया जिल्हा अव्वल ठरला आहे. जिल्ह्याचा एकूण निकाल ९७.३७ टक्के इतका आहे.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी झाल्याने यंदा बारावीची परीक्षा ऑफलाइन घेण्यात आली होती. या परीक्षेकरिता १० हजार ११९ मुले, ९ हजार ८७५ मुली अशा एकूण १९ हजार ९९४ मुला–मुलींनी नोंदणी केली होती. १० हजार ६६ मुले, तर ९ हजार ८५३ मुली अशा एकूण १९ हजार ९१९ मुला–मुलींनी परीक्षा दिली. यात ९ हजार ७१८ मुले आणि ९ हजार ६७८ मुली म्हणजेच १९ हजार ३९६ मुले–मुली उत्तीर्ण झाले. मुलांची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ९६.५४ टक्के इतकी आहे. मुलींची उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ९८.२२ टक्के इतकी आहे. जिल्ह्याचा एकूण निकाल ९७.३७ टक्के लागला असून, नागपूर विभागात गोंदिया जिल्हा अव्वल आला आहे. उल्लेखनीय म्हणजे, यशाची परंपरा कायम ठेवत यंदाही मुलींनीच निकालात बाजी मारली आहे. जिल्ह्यातील बहुतांश कनिष्ठ महाविद्यालयांनी शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली.

गोंदिया येथील गोंदिया शिक्षण संस्थेद्वारा संचालित मनोहरभाई पटेल सैनिकी शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. या शाळेचा विद्यार्थी सत्यम शेंडे याने ८८.८३ टक्के गुण घेऊन शाळेतून प्रथम क्रमांक मिळविला आहे. लक्ष्मीनारायण कावरे ८८.१७ टक्के, तर कुणाल रहमतकर याने ८६.३३ टक्के गुण घेऊन अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे. सर्वच ३८ विद्यार्थ्यांनी प्राविण्यश्रेणी प्राप्त केली आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल गोंदिया शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष वर्षा पटेल, सचिव राजेंद्र जैन, संचालक निखिल जैन, प्राचार्य स्म्रा मिश्रा, सुभेदार रामगोविंद जगणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

साकेत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, गोंदियाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. या महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रयास उमाटे याने ९०.८३ टक्के गुण घेऊन महाविद्यालयातून प्रथम क्रमांक मिळविला आहे. भाविक नानुरे याने ८८.८३ टक्के, तर कशिश नानकानी याने ८८.६७ टक्के गुण घेत अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे.

सडक अर्जुनी तालुक्यातील खजरी येथील आदिवासी विकास हायस्कूल व कला, विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालयाने दहा वर्षांपासून शंभर टक्के निकालाची परंपरा यंदाही कायम ठेवली. कला व विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. सौंदड येथील रामेश्वरदास जमनादास लोहिया माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विज्ञान शाखेचा व आयटीचा शाखेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. विज्ञान शाखेचे ८१ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले होते. सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तसेच आयटी विषयाचे ३४ पैकी ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सडक अर्जुनी येथील जिल्हा परिष कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. विज्ञान शाखेतून एकूण ५० विद्यार्थी परीक्षेला बसले होते. सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तसेच स्व. बनारसीलाल अग्रवाल कनिष्ठ महविद्यालयाचा निकालही शंभर टक्के लागला आहे. डोंगरगाव/ ख. येथील श्री. विक्रमबाबा कला कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. प्राविण्यप्राप्त श्रेणीत १६ विद्यार्थी , प्रथमश्रेणीत २३ विद्यार्थी तर तृतीय श्रेणीमध्ये ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

देवरी तालुक्यातील पुराडा येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. येथील कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतील ५९ पैकी ५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कला शाखेतील ५९ पैकी १ विद्यार्थी गैरहजर असल्याने परीक्षेला बसलेले ५८ पैकी ५८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. नवेगावबांध येथील श्रीमती भा. आ. डोंगरवार कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. विज्ञान शाखेतून आदित्य वामन राऊत ८४.३३ टक्के गुण घेत महाविद्यालयातून प्रथम क्रमांक मिळविला आहे. निकीता शत्रुघ्न डोंगरवार हिने ८३.६७ टक्के, तर अभिजित प्रदीप मेश्राम याने ८२.८३ टक्के गुण घेऊन अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे. कला शाखेतून मनीषा गब्बरसिंग कलचुरी हिने ७८.१७ टक्के गुण घेत महाविद्यालयातून प्रथम क्रमांक मिळविला आहे. हिना अरुण फुंडे हिने ७३.१७ टक्के, तर लिना रतिराम कुंभरे हिने ७३ टक्के गुण घेऊन अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला आहे. उमाबाई संग्रामे कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे. या महाविद्यालयाची विद्यार्थिनी दामिनी नाजूकराम लंजे हिने विज्ञान शाखेत ९०.६७ टक्के गुण मिळवून महाविद्यालयातून प्रथम क्रमांक मिळविला आहे. मृणाल सूर्यभान टेंभुर्णे हिने ७९ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला आहे. कला शाखेतून भूपेश सदानंद रोकडे याने ८१.५० टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक मिळविला आहे. वैष्णवी नेमीचंद वलथरे हिने ८०.५० टक्के, तर गायत्री बाळकृष्ण वाढई हिने ७७.८३ टक्के गुण घेऊन अनुक्रमे द्वितीय, तृतीय क्रमांक मिळविला आहे.

### सरस्वती कनिष्ठ महाविद्यालयाचा अमन अग्रवाल जिल्ह्यातून प्रथम

अर्जुनी मोरगाव : येथील सरस्वती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा विद्यार्थी अमन रमेशचंद्र अग्रवाल याने ९९ टक्के गुण घेत जिल्ह्यातून प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. त्याला ६०० पैकी ५९४ गुण आहेत. कला शाखेचा विद्यार्थी रेशीम प्रकाश लोगडे याने ८७.१७ टक्के गुण घेत कला शाखेतून प्रथम क्रमांक मिळविला आहे. विज्ञान शाखेतून एकूण १६९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यापैकी ९६ विद्यार्थी प्राविण्यश्रेणीत, ७० विद्यार्थी प्रथमश्रेणीत व तीन विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. यासोबतच कला शाखेतून एकूण ६० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यापैकी १० विद्यार्थी प्राविण्यश्रेणीत, ४२ विद्यार्थी प्रथमश्रेणीत व ८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. विज्ञान व कला शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे. विज्ञान शाखेत ९० टक्केच्या वर अकरा विद्यार्थी आले आहेत. यात गुणानुक्रमे पूर्वा टेकराम सावरकर ९३.५० टक्के, सचिन नरेंद्र बिसेन ९३.३३, रोहित सुरेश कापगते ९२.३३ टक्के, गौरव दिनेश चांडक ९१.८३ टक्के, प्राजक्ता अरुण फाये ९१.६७ टक्के, निर्भय विलास कोरे ९१.६७ टक्के, होमी चंदू भुरे ९१.३३ टक्के, शर्वरी प्रमोद निखाडे ९१.१७ टक्के, छबू मोरेश्वर निपाने हिने ९१ टक्के तसेच आशय अनिल चांदेवार याने ९०.१७ टक्के गुण प्राप्त केले आहे. कला शाखेतून अमिषा अरविंद चौधरी हिने ८३.७६ टक्के, दीक्षित कैलाश नंदेश्वर याने ८२.१७ टक्के गुण घेतले आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष डॉ. बल्लभदास भुतडा, संस्थासचिव सर्वेश भुतडा व प्राचार्य अनिल मंत्री यांनी त्यांचे कौतुक केले आहे.



## मणिभाई पटेल महाविद्यालय

**गोरेगाव:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या १२ वीच्या परीक्षेचा निकाल लागला असून यात तालुक्यातील सोनी येथील मणिभाई व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यात विज्ञान शाखेचा निकाल ९८.८८ टक्के लागला असून कला शाखेचा निकाल ९६.८२ टक्के लागला. यात विज्ञान शाखेतून स्नेहा टेंभरे हिने ८८.८३ टक्के गुण प्राप्त करुन प्रथम, रुपेश रहांगडाले याने ८६.१७ टक्के घेऊन द्वितीय तर किर्ती बिसेन हिने ८२.३३ टक्के गुण घेऊन तृतीय तर कला शाखेतून सोमेश्वर कटरे याने ७६.१६ टक्के याने प्रथम, बलशाली खोब्रागडे हिने ६९ टक्के गुण घेऊन द्वितीय तर सागर कोल्हे याने ६८.८३ टक्के गुण प्राप्त करुन तृतीय क्रमांक पटकावून प्राविण्य प्राप्त केले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्राध्यापक व आई–वडीलांना दिले. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाच्यावतीने अभिनंदन करण्यात आले.

## सुकन्या विद्यालय



**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या १२ वीच्या परीक्षेत तालुक्यातील काटी येथील सुकन्या संकल्प निकेतन विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला. विद्यालयातील १०२ विद्यार्थ्यापैकी १०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यार २३ विद्यार्थ्यांनी ७५ टक्केच्यावर गुण प्राप्त करुन प्राविण्य श्रेणी व ७७ विद्यार्थ्यांनी ६० टक्केहून अधिक गुण प्राप्त करुन प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. यात पायल काळबांधे हिने ९१.८३ टक्के गुण प्राप्त करुन काटी केंद्रात प्रथम, नंदिनी उदेपुरे हिने ९१.५० टक्के गुण घेऊन द्वितीय, प्रिती देवाधारी हिने ९०.६७ टक्के घेऊन तृतीय, प्रिया तुरकर हिने ९०.१७ टक्के घेऊन चौथा तर तुलसी देवाधारी हिने ८९.१७ टक्के गुण प्राप्त करुन पाचवा क्रमांक मिळविले. सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई–वडील व शिक्षकांना दिले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यालयाचे संचालक गजेंद्र फुंडे, प्राचार्य दिनेश बहेकार, ए.एम. सेलूकर, बी.सी. बोपचे, एम.पी. रहांगडाले, एम.एन. असाटी व सर्व शिक्षण कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

## अंधत्वावर मात करुन परसवाड्याच्या विनोद ची १२ वी मध्ये उंच भरारी



**गोंदिया:** ०८ जून रोजी जाहीर झालेल्या इयत्ता १२ वीच्या निकालात गोंदिया जिल्ह्यातील तीरोडा तालुक्यात जिल्हा परिषद हायस्कूल परसावडा मध्ये शिकणाऱ्या व जन्मतःअंध असलेल्या विनोद हेमराज कवरे मु. बोरा याने ६६.६६% टक्के गुण प्राप्त करुन घवघवीत यश संपादन केले आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाने इयत्ता १२ वी ची परिक्षा घेतली. या परीक्षेत जिल्हयातील एकूण० सर्व प्रकारचे २०६ दिव्यांग विदयाथी परीक्षेला बसले होतेयात तिरोडा तालुक्यातील बोरा येथील हेमराज कवरे यांचा मुलगा जो जन्मतः अंध आहे तो जिल्हा परिषद हायस्कूल परसवाडा येथे शिकतो. त्याने वर्ग शिक्षक व समग्र शिक्षा अभियानची चमू यांच्या साहाय्याने आपल्या अंधत्वावर मात करुन व अथक परिश्रम करुन ६६.६६% टक्के गुण प्राप्त केले आहे. त्यामुळे सर्वत्र विनोद चे कौतुक होत असुन या करिता विशेष म्हणजे शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) कादर शेख, जिल्हा समन्वयक (दिव्यांग विभाग) विजय ठोकणे यांनी कौतुक केले आहे.



# ग्रामपंचायत तिडका/करड.

## पंचायत समिती अर्जुनी/मोरगाव, जिल्हा परिषद गोंदिया

## निविदा सुचना

निविदा क्र.१ जा.क्र.–१८ ग्रा.पं. तिडका/करड.दिनांक १०/०६/२०२२

ग्रामपंचायत तिडका/करड. पंचायत समिती अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद गोंदिया. येथे १५ वा वित्त आयोग अंतर्गत विवरणातील कामाचे बांधकामाची ई–निविदा महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावार ऑफफाईन पद्धतीने मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फार्मची किमत | जमानत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | बोरवेल व विहीर प्लॉटफार्म तयार करणे | १५००००/– | ५००/– | १५००/– | ६ महिणे |
| २ | अंगणवाडी करळगाव येथे प्लेव्हर ब्लॉक बसविणे. | ८००००/– | | ८००/– | ६ महिणे |
| ३ | सिमेंट क्रांक्रेट रोड दुरुस्ती करणे | १०००००/– | | १०००/– | ६ महिणे |
| ४ | सिमेंट कांक्रेट नाली बांधकाम करणे | १२५०००/– | | १२५०/– | ६ महिणे |

१) वरील कामाचे निविदा फार्म दिनांक १०/०६/२०२२ ला सकाळी १०.०० वाजे पासून ते दिनांक २०/०६/२०२२ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय तिडका/करड. येथे कार्यालयीन वेळेत निविदा फार्म विक्री करण्यात येईल व निविदा फार्म विक्री केल्या नंतर पावती मिळेल.

२) सदर कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक १०/०६/२०२२ ला सकाळी १०.०० वाजे पासून ते दिनांक २०/०६/२/२०२२ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय तिडका/करड. येथे स्विकारण्यात येईल तसेच अमानत रक्कम भरण्याची पावती मिळेल.

३) मोहरबंद निविदा शक्य झाल्यास ग्रामपंचायत तिडका/करड. येथे मासीक सभेत उघडण्यात येईल.

४) सदर कामाची तपशिलवार संपुर्ण माहिती अटी शर्तीसह ग्रामपंचायतच्या नोसीट बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

**ग्रामसेवक**
**ग्राम पंचायत तिडका/करड**

**सरपंच**
**ग्राम पंचायत तिडका/करड**

# ग्रामपंचायत बोळदे/करड

## पंचायत समिती अर्जुनी/मोरगाव, जिल्हा परिषद गोंदिया

## निविदा सुचना

निविदा क्र.१ जा.क्र.–४१ ग्रा.पं. बोळदे/करड.. दिनांक १०/०६/२०२२

ग्रामपंचायत बोळदे/करड. पंचायत समिती अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद गोंदिया. येथे १५ वा वित्त आयोग अंतर्गत विवरणातील कामाचे बांधकामाची ई–निविदा महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावार ऑफफाईन पद्धतीने मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फार्मची किमत | जमानत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | रिपेअर सिमेंट कांक्रेट रोड | १०००००/– | ५००/– | १०००/– | ६ महिणे |
| २ | अंगणवाडी क्र.२ येथे प्लेव्हर ब्लॉक बसविणे. | ६००००/– | | ६००/– | ६ महिणे |
| ३ | सिमेंट क्रांक्रेट नाली | १०००००/– | | १०००/– | ६ महिणे |
| ४ | सिमेंट कांक्रेट नाली बांधकाम करणे | १२००००/– | | १२००/– | |
| ५ | रिपेअर सिमेंट कांक्रेट नाली | ५०,०००/– | | ५००/– | |

१) वरील कामाचे निविदा फार्म दिनांक १०/०६/२०२२ ला सकाळी १०.०० वाजे पासून ते दिनांक २०/०६/२०२२ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय बोळदे/करड. येथे कार्यालयीन वेळेत निविदा फार्म विक्री करण्यात येईल व निविदा फार्म विक्री केल्या नंतर पावती मिळेल.

२) सदर कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक १०/०६/२०२२ ला सकाळी १०.०० वाजे पासून ते दिनांक २०/०६/२/२०२२ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय बोळदे/करड. येथे स्विकारण्यात येईल तसेच अमानत रक्कम भरण्याची पावती मिळेल.

३) मोहरबंद निविदा शक्य झाल्यास ग्रामपंचायत बोळदे/करड. येथे मासीक सभेत उघडण्यात येईल.

४) सदर कामाची तपशिलवार संपुर्ण माहिती अटी शर्तीसह ग्रामपंचायतच्या नोसीट बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

**पी.एस.हुकरे**
ग्रामसेवक
ग्राम पंचायत बोळदे/करड

**श्रीमती एम.डी.लंजे**
सरपंच
ग्राम पंचायत बोळदे/करड

साप्ताहिक बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक
http://berartimes.com


# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरही भोगतात नरकयातना

## मुरकुटडोह व दंडारी येथील समस्या : राजमाता फुलवादेवींकडे मांडली व्यथा



### जिल्हाधिकाऱ्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांचे फक्त आश्वासन

**सालेकसा तालुक्यातील मुरकुटडोह व दंडारी गावात अनेक समस्या उद्भवले असून या गावातील समस्या मागी लावण्याकरिता येथील नागरिकांनी जिल्हाधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांना अनेकवेळ निवेदन दिले. मात्र, त्यांच्याकडून फक्त आश्वासनच मिळत असून अद्याप मुरकुटडोह व दंडारी गाव विकासापासून कोसोदूर आहे.**

### रुग्णालयात नेण्यासाठी त्रास

**बोदलाबोडी-भजेपार मार्गावरील बाघ नदीवर पूल नाही. कित्येक वर्षांपासून पुलाची मागणी होत आहे. मात्र, लोकप्रतिनिधी लक्ष देत नाही. परिणामी गंभीर आजारी व गर्भवती मातांना तालुक्याच्या ठिकाणी नेण्याकरिता त्रास सहन करावा लागतो. कधीकाळी तर रुग्णालयात नेताना वाटेतच रुग्णाचा जीव जातो.**



### शेतकऱ्यांना सिंचनासाठी मिळत नाही पाणी

**सालेकसा तालुक्यातील दंडारी येथे १९८४ मध्ये तलावाची निर्मिती करण्यात आली. या तलावातून शेकडो शेतकऱ्यांना सिंचनाकरिता पाणी मिळू शकतो. मात्र, अद्याप या तलावाचे पाणी शेतकऱ्यांनाकरिता सोडण्यात आले नाही. त्यामुळे येथील शेतकरी सिंचनापासून दूरच आहेत.**

### रोजगारासाठी परराज्यात भटकंती

**सालेकसा तालुक्यातील अनेक युवक सुशिक्षित आहेत. मात्र, त्यांना सालेकसा तालुक्यात रोजगार मिळत आहे. परिणामी, त्यांना नोकरीच्या शोधात नागपूर, हैदराबाद किंवा परराज्यात भटकावे लागत आहे.**

**सालेकसा:** सातपुडा आणि मायकल पर्वताच्या त्रिकोणी संगमाच्या मधोमध घनदाट जंगलात सालेकसा तालुक्यातील मुरकुटडोह व दंडारी गावे वसलेली आहे. या गावात आरोग्य सेवा नाही, शाळा नाही, रोजगार नाही, शासनाच्या योजनाही पोहोचत नाही, पक्के रस्ते नसल्यामुळे या गावातील नागरिक स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतरही नरकयातना भोगत आहेत, अशी व्यथा आदिवासी बांधवांनी नवी दिल्ली येथील राजमाता फुलवादेवी यांच्याकडे मांडली.

सालेकसा तालुक्यातील अतिदुर्गम संवेदनशील दरेकसा माळरानाने व्यापला आहे. या भागातील काही वस्त्या दरीडोंगरात वसलेले आहेत. मुरकुडोह १, मुरकुडोह २, मुरकुडोह ३, दंडारी, ही गावे आदिवासी संस्कृती जपणारे गावे आहेत. सालेकसावरून १८ किलोमीटर अंतरावर जंगलातून वाट काढत या गावांमध्ये जावे लागते. शासकीय अंगणवाडी वगळता कुठलीही सोय या गावांमध्ये नाही. दरेकसा येथील शासकीय रुग्णालयात आजारी रुग्णाला नेण्याकरिता खाटेवर टाकून जंगलाची वाट तुडवत न्यावे लागते. या गावात जाण्याकरिता धड रस्ते नसल्यामुळे कुठलाही शासकीय कर्मचारी येथे पोचत नाही. त्यामुळे कुठलीही शासकीय योजना या गावांमध्ये पोचली नाही. पावसाळ्यात या गावांचा बाहेरील जगाशी संपर्क तुटतो. नक्षलग्रस्त भागात या गावांचा समावेश होत असल्याने येथे पोलिस सहसा वेळेवर पोचत नाही. शासकीय यंत्रणा, आरोग्य, रस्ते, पाणी, सुरक्षा आदी बाबींपासून हा भाग अद्याप दूर आहे. हा भाग महाराष्ट्र छत्तीसगड आणि मध्य प्रदेश राज्याला लागून असल्याने हे नक्षल्यांचे गड आहे. या भागाचा ते प्रामुख्याने आसरा म्हणून वापर करतात असे मानले जाते. त्यामुळे या भागात विकासकामे करायला शासन, शासकीय कर्मचारी, कंत्राटदार येथे येत नाहीत, अशी व्यथा येथील आदिवासी बांधवांनी श्री मांझी अंतरराष्ट्रीय समाजवादी आदिवासी किसान सैनिक तथा अखिल भारतीय माता दंतेवाडीन समाज समिती नवी दिल्लीची संस्थापक राजमाता फुलवादेवी यांच्याकडे मांडली.

# गोंदिया भंडारा जिल्ह्याच्या सांभाळ हेच जीवन प्रवासाचे गमक-खा.पटेल

**गोंदिया :** गोंदिया : गोंदिया व भंडारा या दोन्ही जिल्ह्याशी आपल कौटुंबिक नाते आहे. दोन्ही जिल्ह्यात राजकीय व सामाजिक कामे करताना अनेक चढ-उतराला समोर जावे लागले.

मात्र, या जिल्ह्यातूनच मला प्रतिनिधित्वाची संधी मिळाली. हे माझे सौभाग्य आहे. मी कितीही शिखरावर असलो तरी माझ्या जीवन प्रवासात दोन्ही जिल्ह्याचा सांभाळ खांद्यावर आहे. हे कधीही स्मरणात राहते. त्यामुळे या दोन्ही जिल्ह्याचा सांभाळ जीवन प्रवासाचे गमक आहे, अशी स्पष्टोक्ती खा. प्रफुल्ल पटेल यांनी दिली.

राज्यसभेवर पुन्हा निर्वाचित झाल्यानंतर खा. प्रफुल्ल पटेल या (ता.११) गोंदिया व भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. यानिमित्त स्थानिक नमाद महाविद्यालयाच्या आडोटोरियम येथे २०० हून अधिक संस्था व संघटनातर्फे आयोजित नागरी सत्कार कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

खा. पटेल पुढे म्हणाले, मागील ३२ वर्षांपासून लोकसभा व राज्यसभेत प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. हे माझे सौभाग्य आहे. गोंदिया व भंडारा जिल्ह्याचे सर्वात मोठे दायित्व माझ्या खांद्यावर आहे,



हे मी कधीही विसरणार नाही. या दोन्ही जिल्ह्याच्या विकासासाठी सदैव झटत राहणार. मी गोंदिया जिल्ह्याचा विकासासाठी कसलेही राजकारण आडकाठी येवू देत नाही. गोंदिया व भंडारा हे दोन्ही जिल्हे माझे कुटुंब आहेत, अशीही ग्वाही खा. पटेल यांनी दिली.

यावेळी मंचावर आ. विनोद अग्रवाल, आ. मनोहर चंद्रिकापुरे, आ. राजू कारेमोरे, माजी आमदार राजेंद्र जैन, जि.प.उपाध्यक्ष यशवंत गणवीर, माजी नगराध्यक्ष अशोक इंगळे, माजी आमदार भेरसिंह नागपुरे, अनिल बावणकर, शिवसेनेचे मुकेश शिवहरे, राजु कुथे, दामोदर अग्रवाल, पं.स.सभापती मुनेश रहांगडाले यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.

विशेष म्हणजे, खासदार पटेल यांची राज्यसभेत निवड झाल्यानंतर त्यांचे शनिवारी आगमन झाल्यानंतर गोरेगाव, सडक-अर्जुनी व तिरोडा येथेही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व विविध सामाजिक संघटनांकडून सत्कार करण्यात आला.

**तिरोडा येथे युवा नेते रविकांत खुशाल बोपचे यांच्या नेतृत्वात सत्कार कार्यक्रम पार पडला.एकोडी येथे जिल्हा परिषद सदस्य अश्विनी रवी पटले,रवी पटले,सडक अर्जुनी येथे आमदार मनोहर चंद्रिकापूरे,गोरेगाव येथे केवल बघेले,डव्वा येथे गंगाधर परशुरामकर यांनी कार्यक्रम आयोजित पटेलांचा सत्कार केला.**

# निराधार विद्यार्थ्यांचा सारथी-उमेश कोर्राम

**नवी दिल्ली:** तथाकथित गाजलेल्या ओबीसी नेत्यांना खजिल करणारे काम एका सामान्य निराधार कुटुंबातील परिक्षार्थीने महाज्योती ही ओबीसी विद्यार्थ्यांसाठीची संस्था जन्माला घालून करून दाखविले.

ओबीसी नावाने ढोल वाजवून ३०-४० वर्षांपासून राजकारण करणाऱ्या व राजकारणात आपली पुढच्या पिढीला स्थापित करणाऱ्या भुजबळ वडेट्टीवार मुंढेंना लाजवेल अशी हितकारी योजना-संस्था, upsc परिक्षार्थी असलेले भंडारा जिल्ह्यातील उमेश कोर्राम या युवकांने बनवून दाखविल्याने निराधार विद्यार्थ्यांचा खरा सारथी ठरला आहे.



एससी,एसटी,ओबीसी वीजेएनटी, एनटी, एसबीसी अशा सर्व मागास समाजातील विद्यार्थ्यांना लाभदायी ठरेल अशा मागण्या सरकार दरबारी पोहचवत विद्यार्थ्यांना नि:शुल्क सेवा सुविधा देणारे हुनरबाज विद्यार्थी नेतृत्व उमेश कोर्राम सध्या सर्व राज्याच्या विद्यार्थ्यांमध्ये दिल्लीत कौतुकाचा विषय ठरला आहे.अनके राज्यांच्या विद्यार्थ्यांनी आपापल्या राज्यात या योजनांसाठी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात उमेश कोर्रामंची भेट घेत चर्चा केली.

जवळपास एक महिना घर सोडून मुंबईत ठाण मांडून वारंवार बैठक भेटीगाठी कागदपत्र, मुख्यमंत्र्यांची भेट, विधानसभेत मुद्दा उपस्थित करणारे सदस्य आमदार शोधणे, विषय देणे, आदी कामासाठी चालतेबोलते कार्यालय उमेश आणि टीमने चालवले. या सर्व घडामोडीपाठीवर बारकाईने नजर व सूचना करणारे कमलेश पाटील यांचे संचालन कामी येत होते.

बार्टी,TRTI,सारथीच्या धर्तीवर obc विद्यार्थ्यांसाठी एक स्वतंत्र संस्था असावी यासाठी २६ मार्च २०१९ पहिला प्रताव तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना स्टुडंट यूनियन असोसिएशन ऑफ ईडिया तर्फे दिला गेला होता.नंतर चालू असलेल्या विधानसभा अधिवेशनात विषय मार्गी लावण्यासाठी उमेश कोर्राम, रणजित ठिपे, आकाश बांबोडे, नितीन ईंगळे, किरण परदेशी, प्रशांत उंदिरवाडे यांच्या चमूने त्यावेळचे सर्वश्री आमदार बच्चूभाऊ कडू, जितेंद्र आव्हाड, छगन भुजबळ, धनंजय मुंढे, खा.इम्तियाज जलील,तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व संबंधित विभागाचे तत्कालीन मंत्री डॉ संजय कुटे, सारथीचे संचालक परिहार यांच्याशी भेटीगाठी करीत विषय समोर आणला.आणि तो प्रस्ताव विधानसभेत सादर होईपासून तर संस्थेचे नाव महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावावरून महाज्योती ठरवण्यापर्यंत उमेश कोर्राम या युवकाने चमूच्या मदतीने सक्रिय भूमिका पार पाडल्यामुळेच ओबीसीसांठी महाज्योती ही संस्था खरी जन्माला आली.यासाठी सहज साधारण स्वभावाचे अधिकारी परिहार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.उमेशच्या या कार्याची दखल घेत मराठा सेवा संघाच्या वतीने दिल्लीस्थित महाराष्ट्र सदनातील प्रशस्त परिसरात पानिपत मराठा शौर्यदिन समारोह सम्मान चिन्ह देऊन गौरवान्वित आले.

यावेळी मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष शिवक्रांतीदूत कमलेश पाटील, दिल्ली प्रदेश अध्यक्ष तथा सुप्रीम कोर्टाचे वरिष्ठ वकिल आकाश काकडे सोबत टीमचे सदस्य शिवश्री आकाश बोंबडे, मनोज सुरोसे, संकेत पाटील, अक्षय वानरे, कमलेश उके, खुशाल सेठ उपस्थित होते.

# ग्रामपंचायत नालीवर सुरक्षा भितींचे बांधकाम सुरू

**चिचगड:** येथील ग्रामपंचायतीने सांडपाणी वाहून जाण्यासाठी तयार केलेल्या नालीवर स्वास्तिक राईस मिलचे मालक शैलेश (अण्णा) सुरेंद्रकुमार जैन यांनी सुरक्षा भिंतीचे बांधकाम सुरु केल्याची तक्रार नागरिकांनी ग्रामपंचायत सरपंच व सचिवाकंडे केली आहे.



नागरिकांनी जैन यांच्यावतीने ग्रामपंचायतच्या नालीवर होणारे बांधकाम त्वरित थांबवावे अशी मागणी वार्डातील नागरीकांच्यावतीने करण्यात आली असून सांडपाणी वाहून जाणाऱ्या नालीवर बांधकाम करण्याचा अधिकार कुणालाही नसताना मात्र काही धनधांडगे पैशाच्या बळावर असे करत असताना ग्रामपंचायतीचे पदाधिकारी मात्र कारवाई करण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याची ओरड सुरु झाली आहे.

# धान खरेदीची मर्यादा वाढविण्यासाठी राष्ट्रवादीचे निवेदन

सडक-अर्जुनी: सन २०२१-२२ या रब्बी हंगामामध्ये धान खरेदीची मर्यादा वाढवून खरेदी केंद्र सुरु करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने मगंळवार १४ जून रोजी तहसिलदार यांच्यामार्फेत निवेदन पाठविण्यात आले.

निवेदनात ९ लक्ष १२ हजार क्विंटल खरेदीची केंद्र शासनाकडून परवानगी असल्याचे सांगून धान खरेदी बंद करण्यात आल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत.जेव्हा की राज्याच्या कृषीविभागाने यावर्षी १७ क्वीटल खरेदीबाबतचे पत्र देण्यात आले.उपरोक्त खरेदी प्रमाणे फक्त ३५ टक्के शेतकऱ्याची खरेदी झाली असून ६५ टक्के शेतकऱ्याचे धान अजूनही शेतात किंवा घरीच पडले आहे. त्या मुळे येणाऱ्या खरीप हंगामा करिता शेतकऱ्यांना खते -बियाणे व इतर शेतीची साधने घेण्याकरिता पैसा नाही.त्यामुळे शेतकऱ्यांनी आनलाईन केलेल्या आकडेवारी नुसार ३३ लक्ष लक्ष क्विटलपर्यंत शासकीय धान खरेदीची मर्यादा केंद्र सरकारने द्यावे अशी मागणी सडक अर्जुनी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून तहसीलदार बागडे यांना प्रधानमंत्री यांच्या नावे असलेले निवेदन देवून करण्यात आली.



या निवेदनाची दखल न घेतल्यास उग्र आदोलन करण्याचा इशारा तालुका अध्यक्ष अविनाश काशिवार,रमेश चुऱ्हे, तेजराम मंडावी वंदना डोंगरवार, रुकीराम वाढई, उमराव मांढरे, शिवाजी गहाणे, रजनी गिऱ्हेपुंजे, महिला तालुका अध्यक्ष, मुन्निश्वर कापगते, सुभाष कापगते, आनंदकुमार अग्रवाल, दिलीप गभने, कामिनी कोवे, प्रमोद लांजेवार भागवत झिंगरे, श्रीराम झिंगरे, सुखदेव कोरे, मोतीराम कापगते, अमीन शेख, हेमराज खोटेले,धनराज भेंडारकर, देवचन टेभुंर्णे, प्रमिला मटाले आंदीनी दिला आहे.

# १५ जूनला भवभूती सभागृहात "तृतीय रत्न'

**गोंदिया**-येथील भवभूती सभागृहात दिनांक १५ जून रोजी सायंकाळी ७ वाजता "तृतीय रत्न' या नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यात येत आहे. या नाट्यप्रयोगासाठी नि:शुल्क प्रवेश ठेवण्यात आला आहे. महात्मा ज्योतीबा फुले यांच्या शैक्षणीक ध्येयांनी प्रेरीत सामाजिक विचारांचा प्रसार व्हावा, त्यांच्या समाज प्रबोधनासाठीच्या प्रयत्नांचे मोल कळावे या हेतूने मंत्री इतर मागास बहुजन कल्याण विभाग तथा महाज्योतीचे अध्यक्ष विजय वडेट्टीवार, संचालक डॉ. बबनराव तायवाडे, प्रा. दिवाकर गमे, लक्ष्मण वडले यांनी महाज्योतीच्या वतीने राज्यातील विविध जिल्ह्यात महात्मा ज्योतीबा फुले लिखित "तृतीय रत्न'नाटकाच्या प्रयोग करण्याचे योजिले आहे.

अनिरुद्ध वनकर यांनी नाटकाचे दिग्दर्शन केले असून क्रीएटीव्ह हेड प्रा. संगीता टिपले आहेत.३० कलाकार व सहकाऱ्यांचा या नाटकात सहभाग असणार आहे.प्रेक्षक आणि माध्यमांकडून त्याला उस्फुर्त असा प्रबोधनात्मक प्रतिसाद मिळाला आहे. सदर नाट्यप्रयोगास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन व्यवस्थापकीय संचालक महाज्योती यांनी केले आहे.

# मच्छिमार संस्थेच्या अध्यक्षांनी केली सभासदांची फसवणूक

## १ लाख ८२ हजारांचा घोटाळा केल्याचा आरोप

विपुल परिहार

**मोहाडी :-** सालई खुर्दच्या मच्छिमार सहकारी संस्थेत ,सुरू असलेला घोटाळा आणि १ लाख ८२ हजार रुपयांचा अपहार प्रकरणी चौकशी करून कार्यवाही करण्याऐवजी दोषींना संरक्षण दिले जात असल्याचा आरोप संघटनेच्या सभासदांनी केला आहे.

मच्छिमार सहकारी संस्था सालई खुर्दच्या शाखेत हेत असलेला घोटाळा आणि सभासदांची होणारी फसवणूक यासंदर्भात दोषींवर कारवाई करून सभासदांना न्याय मिळावा, अशी मागणी गेल्या तीन महिन्यांपासून केली जात आहे. असे असताना जबाबदार अधिकाऱ्यांकडून कोणतीही कार्यवाही होत नाही. यामध्ये संस्थेच्या अध्यक्षांनी फसवणूक केल्याप्रकरणी तसेच काही सभासदांना सोसायटीने काम न दिल्याने लूट केल्याचा आरोप सभासदांनी केला असून २०२०-२१ च्या अतिवृष्टीबाबत मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेले १ लाख ८२ हजार रुपये पत्रव्यवहार करूनही अधिका?यांकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या संदर्भात सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय भंडारा यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी खबरदारी घेऊन कारवाई करण्यात येईल, असे सांगितले, मात्र ३ महिने उलटले तरी अद्याप कोणतीच कार्यवाही न झाल्याने अधिकारी योग्य वृत्ती अवलंबत नाहीत, असा आरोप केला जात आहे.

सभासदांच्या बनावट सह्या करून ही रक्कम काढण्यात आली. मात्र आजही हे प्रकरण पोलीस ठाण्यातील फायलींमध्ये धूळखात पडून आहे.

### संघटनेत कोणताही घोटाळा नाही-अध्यक्ष सुरेश मांधरे

**संस्थेवर झालेले सर्व आरोप बिनबुडाचे व खोटे असून, सर्व सभासदांना आमच्यावर काम देऊन संस्थेची बदनामी केली जात आहे, असे अध्यक्ष व सचिवांकडून सांगण्यात आले.**

गेल्या ३ वर्षांपासून तलावात कोणतेही काम किंवा मासेमारीचे काम दिले गेले नाही आणि संस्थेच्या तलावावर अध्यक्षांच्या मान्यतेने बाहेरील लोक मासे पकडतात. त्याचप्रमाणे सचिव आणि अध्यक्षांनी मासेमारीवर बनावट स्वाक्षरी करून रजिस्टर दाखविले. सभा होत नसतानाही रजिस्टरवर सर्वसाधारण सभा दाखवली जाते, संस्थेच्या सदस्यांना मासेमारी करार दिला जात नाही, असा आरोप सदस्यांनी केला आहे.

मी संस्थेचा सभासद आहे, असा आरोप भारत गयानीराम मांद्रे यांनी संस्थेवर केला आहे, नियमानुसार सर्व सभासदांना १ लाख ८५ हजार अनुदान वाटप करायचे होते, मात्र संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी अनुदानाची संपूर्ण रक्कम परत केली नाही. याबाबत सर्व संबंधितांची चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.मत्स्यव्यवसाय संस्था सालई खुर्द रजिस्टर क्रमांक ३१९ संस्थेच्या अध्यक्षांच्या जाणीवपूर्वक कामामुळे सभासद गेल्या ३ वर्षांपासून मत्स्यव्यवसायापासून वंचित आहे.

# रस्ते अपघात कमी करण्यासाठी उपाययोजना करा- खासदार नेते

**गोंदिया,:** विविध कारणांमुळे रस्त्यावर होणाऱ्या अपघातात नागरिकांना आपला जीव गमवावा लागतो. मानवाचा जीव अत्यंत मोलाचा असून रस्त्यावर होणारे अपघात कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात अशा सूचना खासदार व समिती अध्यक्ष अशोक नेते यांनी दिल्या.



बैठकीत आमगाव-कामठा मार्गाचे बांधकाम करण्यासोबतच आमगाव गोंदिया मार्गावर सुरु असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामाचा आढावा घेत काम गतीने करुन सुरक्षेच्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

संसद रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत ते बोलत होते. खासदार अशोक नेते यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली होती. खासदार सुनील मेंढे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजवर्धन करपे, कार्यकारी अभियंता एन. टी लभाने, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबरीश मोहबे व अधिकारी ,माजी जि.प.अध्यक्ष विजय शिवणकर, गजेंद्र फुंडे,जिल्हा परिषद सभापती संजय टेंभरे,घनश्याम अग्रवाल,यशवंत मानकर,संजय कुलकणी, शंभूदयाल अग्रिका,प्रमोद कटकवार,नरेन्द्र बाजपाई,नविन जैन आदी पदाधिकारी सुध्दा उपस्थित होते.

जल्ह्यातील रस्त्यावर असणाऱ्या ब्लॅक स्पॉटची संख्या कमी करण्यासाठी नियोजन करण्यात यावे. सध्या जिल्ह्यात आठ ब्लॅक स्पॉट आहेत. जिल्ह्यातील रस्त्यावर असणाऱ्या स्पीड ब्रेकरचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याच्या सूचना त्यांनी या बैठकीत दिल्या. प्रत्येक रस्त्यावर ट्राफिक साईन असल्याची खात्री करून घ्यावी असे त्यांनी सांगितले. १०८ अम्ब्युलन्स सेवेचा या बैठकीत आढावा घेण्यात आला.

मागील चार वर्षात जिल्ह्यात अपघातात मृत्यू झाल्याच्या संख्येत घट झाली आहे. २०१८ मध्ये १७४ अपघात, २०१९ मध्ये १६०, २०२० मध्ये १४० व २०२१ मध्ये १३२ मृत्यू अपघातात झालेत. गेल्या चार वर्षात ही संख्या घटली आहे.

जिल्ह्यात रस्ता सुरक्षा संबंधी कामकाजावर लक्ष ठेवणे, रस्त्यावर होणाऱ्या अपघाताची आकडेवारी ठेवणे, रस्त्यावर होणाऱ्या अपघातांच्या कारणांचे अध्ययन व उपाययोजना करणे, अपघात प्रवण स्थळांची निश्चिती करणे व त्यांच्यात सुधारणा करणे, रस्ते सुरक्षा विषयक मानकांची निश्चिती करणे आदी सुरक्षा समितीची कार्ये आहेत.

रस्ते अपघात आढावा, ब्लॅक स्पॉट आढावा व उपाययोजना, अपघाताचे विश्लेषण करण्यासाठी आयआरएडी एपचा वापर, जीवणदूत योजना, रुग्णवाहिका १०८ आढावा, रस्त्यावर दिशादर्शक, माहितीदर्शक फलक लावणे व रस्ता सुरक्षा जनजागृती व अंमलबजावणी या विषयावर या बैठकीत चर्चा करण्यात आली.

### अपघातग्रस्त व्यक्तीला मदत करणाऱ्यास बक्षिस

रस्त्यावर अपघात झाल्यास अपघातग्रस्त व्यक्तीला मदत केल्यास आपल्याला पोलीस त्रास देतील असा नागरिकांचा समज आहे. असे अजिबात नसून अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीला तात्काळ उपचार मिळण्यासाठी नागरिकांनी पुढे यावे. मदत करणाऱ्या व्यक्तीवर कुठल्याही प्रकारची कारवाई करू नये असे न्यायालयाचे निर्देश आहेत. अपघातग्रस्त व्यक्तीला मदत करणाऱ्या व्यक्तीला आता जिल्हास्तरावर पाच हजार रुपये रोख बक्षिस देण्यात येणार आहे.

# खत उपलब्धतेची माहिती आता एका क्लीकवर

**भंडारा :** खरीप हंगामात शेतकऱ्यांना जिल्ह्यातील खतांची उपलब्धता लगेच कळण्यासाठी जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने ब्लॉगची निर्मिती केली आहे. जिल्ह्यातील तालुकानिहाय कृषी केंद्रावर उपलब्ध असलेल्या खत साठ्याची माहिती adobhandarafertilizerblogspot.com या लिंकवर उपलब्ध आहे. या ब्लॉगवर गेल्यास शेतकऱ्यांना उपलब्ध खतसाठ्याची माहिती सहज मिळेल.सध्या खरीप हंगामाची तयारी सुरू झाली आहे. शेतकरी शेतीच्या मशागतीत गुंतलेला असून काही कृषी सेवा केंद्र चालक शेतकऱ्यांना खत नसल्याचे सांगत खताची साठेबाजी करत आहे. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडतात व त्यांना जास्त भावाने बाजारातून खत खरेदी करावे लागते. यासाठीच शेतकऱ्यांना सुलभता व्हावी या उद्देशाने कृषी विभागाने हा ब्लॉग तयार केला आहे. साठेबाजीला आळा घालण्यासाठी या ब्लॉगचा उपयोग होणार आहे.

# शहरातील विविध समस्यांवर तोडगा काढा : खा.मेंढे

**गोंदिया:** महाराष्ट्र जिवन प्राधिकरण व नगर परिषद गोंदिया यांच्या सोबत आज झालेल्या संयुक्त बैठकीत गोंदिया शहरातील समस्यांवर चर्चा करून अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. शहरातील लोकसंख्या दिवसें दिवस वाढत असल्याने वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी प्रस्ताव तयार करण्यात यावे . ज्यामुळे शहरात दोन्ही वेळा पाणी शहरात पुरवठा करण्यात येईल. व त्या अनुपाताने शहरात पाणी पुरवठ्याचे नियोजन करणे. पावसाळ्यापूर्वी गटर योजनेचे सुरु असलेले काम पूर्ण करणे. शहराच्या उत्तर दक्षिण भागाला जोडणाऱ्या पाईप लाईनसाठी रेल्वे विभागाकडे पाठपुरावा करणे तसेच शहरातील गटार जोडणीसाठी आवश्यक योजना तयार करण्यासाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्याना निर्देश देण्यात आले.



मोक्षधाम परिसरात असलेल्या डंपिंग यार्ड मुळे नागरिकांना दुगंधी स्वच्छता इ. समस्यांचा सामना करावा लागतो. डंपिंग यार्ड साठी नवीन जागा उपलब्ध करून देऊन मोक्षधाम परिसरातील डंपिग यार्ड ची जागा रद्द करण्याबाबत नियोजन करण्याचे निर्देश खा.मेंढे यांनी दिले. रहदारीच्या असलेल्या जयस्तंभ चौक व नेहरू चौक येथे सार्वजनिक स्वच्छता गृहे उभारणे व स्वच्छता सप्ताहाचे नियोजन करून प्रत्येक वार्ड मध्ये सफाई अभियान सुरु करण्याचे निर्देश नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांना दिले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील चारही मुख्य नाल्यांची स्वच्छता झाली असल्याची माहिती यावेळी अधिकाऱ्यांनी उपस्थितांना दिली.

नागरिकांना पाण्यासाठी फिरावे लागू नये यासाठी हर घर नल हि योजना सुरु करण्यात आली. योजनेचा फायदा सर्व नागरिकांना मिळावा यासाठी शहरातील अवैध नळ जोडणी शोधून वापरलेल्या पाण्याचे मुल्य वसूल करण्याचे निर्देशही खा.मेंढे यानी दिले.यावेळी खा.सुनिल मेंढे, बाळाभाऊ अंजनकर, राजकुमार कुथे, ओम कटरे, भावना कदम, गजेंद्र फुन्डे, सुनिल केलनका, बंटी पंचबुद्धे,संजय मुरकुटे, ऋषिकांत शाहू, चंद्रभान तरोने,दीपक कदम, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, मुख्य अधिकारी करण चव्हाण,राणे व सर्व अधिकारी वर्ग उपस्थित होते.